


संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा



हिंदुत्वाचा बुलंद आवाज
मा.श्री.राजसाहेब ठाकरे यांना वाढदिवस शुभेच्छा

प्रकाश गायकवाड । अनिकेत शियाळ । प्रमोद जाधव । निखिल देशपांडे । स्वप्निल वाघ । संकेत जरे । मनिष मेढे । अजय दावभट । हृषिकेश हजारे
अमोल कर्पे । अमोल बोरुडे । विशाल जगताप । तुषार इंगळे । अक्षय वराट । योगेश गुंड । दिपक मगर । संदिप काळे । क्षितिज वाणी । पंकज साठे । सुरज वाणे । आकाश साळवे
अक्षय कोटा । दिनेश जाधव । योगेश गडप्पा । मयुर डहाळे । राहुल वर्मा । आकाश साबळे । अक्षय आरडे । देवेंद्र मुनोत । कौशल रासने । मयुर वर्मा । अपुर्व मुळे । जालिंदर बांडे । योगेश मोटे
किरण देवकर । निखिल बुरा । प्रमोद ठाकुर । सुमित उगार । सनी वैराळ । विजय पुंड । प्रविण गायकवाड । अनमोल रामनानी । साहील धोत्रे । अमोल शिंदे । राहुल गांधी । शंकर गोरे
सतिश हिरानंदानी । अभिषेक कलमदाणे । प्रविण गायकवाड । मयुर मिसाळ । अमोल भालसिंग । अभीजीत अंमलदार । अभिषेक अनंलदास । अभिषेक वर्पे, निखिल साबळे, निखिल लगड
अक्षय कर्डिले । आयुष पाथरकर । आयुष नागरे । बालाजी गिरी । नागनाथ नाईक । ओम बारसे । तनीश गायकवाड । स्वप्निल पिटला । सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी...





मा.श्री.सुमित संतोष वर्मा
महाराष्ट्र उपाध्यक्ष : महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना सुमित वर्मा युवा मंच, अ.नगर



रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, शुक्रवार दि. १४.०६.२०२४ | अंक नं. ०८९ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020


# आश्वासन देवूनही कामे न करता नागरिकांना काढले वेड्यात; सुविधा द्या अन्यथा महापालिकेच्या कचरा डेपोला टाळे ठोकणार

## बुरुडगाव ग्रामस्थांचा आयुक्तांना निवेदनाद्वारे इशारा; १९ जूनला बैठकीचे आयोजन

नगर - कचरा डेपोला ना हरकत प्रमाणपत्र देताना महापालिकेने बुरुडगाव ग्रामस्थांना दिलेल्या एकाही आश्वासनाची पूर्तता ५ वर्षात केलेली नाही. विशेषतः पाण्याच्या प्रश्नाबाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. महापालिकेच्या अधिकारी, पदाधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना वेड्यात काढण्याचे काम केले असून, बैठकीत ठरलेल्या निर्णयाप्रमाणे प्रशासनाने लवकरात लवकर कामे मार्गी लावावीत अन्यथा यापुढे महापालिकेशी कोणताही पत्रव्यवहार न करता कचरा गाड्या डेपोत जाऊ न देता डेपोला टाळे लावण्याचा इशारा बुरुडगावच्या ग्रामस्थांनी दिला आहे.

यासंदर्भात माजी सरपंच बापूसाहेब कुलट यांच्यासह ग्रामस्थांनी शुक्रवारी (दि. १४) महापालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांना निवेदन दिले. यावेळी बाजीराव शिंदे, नानाभाऊ मोढवे, भानुदास घोडके, सिताराम जाधव आदी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, महानगरपालिकेला २०१९ मध्ये बुरुडगांव कचरा डेपोसाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. इतिवृत्ताप्रमाणे पिण्याचे पाणी, पाईपलाईन, बुरुडगांव ते कचरा डेपोपर्यंत पाईपलाईन विद्युत पथदिवे, रस्ता, ड्रेनेज व दुतर्फा वृक्षारोपण करून देण्याचे ठरविले होते. यापैकी मनपाने कुठलीही सुविधा बुरुडगांवकरांना दिलेली नाही. कुठल्याही कामाची पुर्तता झालेली नाही. मनपाचे आयुक्त, आमदार, नगरसेवक, सर्व पदाधिकारी मिटिंगला उपस्थित होते. ५ वर्ष पुर्ण झाले तरी बुरुडगांवकरांना सुविधा पुरविल्या नाहीत. गावकऱ्यांना वेड्यात काढण्याचे काम केले आहे. एवढेच काय पण कचरा डेपोला आग लागली की लावली? याची कसून चौकशी होत नाही.

बुरुडगावातील तसेच शहरातील जनतेला वेळेवर पाणी मिळत नाही, परंतु मनपा डेपोला लागलेली आग विझविण्यासाठी मुळा डॅमच्या पाण्याचा वापर करावा लागत आहे. कचरा डेपोशेजारी अनेक शेतकऱ्यांच्या खाऱ्या पाण्याच्या विहिरी आहेत, त्यांना विनंती केली तर अहोरात्र आग विझवण्यासाठी पाणी उपलब्ध झाले असते. वसंत टेकडीवरुन पाण्याची एक ट्रिप आणण्यासाठी एक ते दिड तास लागतो. शेतकऱ्यांना २०० रुपयेप्रमाणे ट्रिप दिली किंवा सिना नदीतून पाणी उपसले तर १२ तासाच्या आत डेपोला लागलेली आग विझवण्यास यश आले असते परंतु याचा विचार कुठलाही अधिकारी करत नाही. कचरा डेपोसाठी ना हरकत प्रमाणपत्र घेऊन स्वतःचे नातेवाईक, जवळचे पंटर यांना उद्योगधंदे चालविण्याकरिता दिले आहेत. बुरुडगावातील सर्व नागरिकांना वाऱ्यावर सोडले आहे. पिसाळलेली कुत्रे, रानडुकरे याचा सर्व त्रास शेजारील शेतकऱ्यांना होत आहे. सावेडी डेपोत अधिकारी व पदाधिकारी यांना मलिदा मिळालेला आहे. संबंधित अधिकारी यांनी इतिवृत्ताप्रमाणे असलेली कामे लवकरात लवकर सुरु करावीत अन्यथा यापुढे मनपाला कुठलाही पत्र व्यवहार न करता कचरा डेपोला येणाऱ्या कचरा गाड्या डेपोत न जाऊ देता डेपोला कुलुप लावण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

या संदर्भात १९ जून रोजी दुपारी १२ वाजता बैठक आयोजित करण्याच्या सूचना आयुक्त डॉ. जावळे यांनी उपायुक्त, सामान्य प्रशासन यांना दिले आहेत.



बुरुडगावमधील कामे आश्वासनाप्रमाणे मार्गी लावावीत या मागणीचे निवेदन महापालिका आयुक्त डॉ. पंकज जावळे यांना देताना बापूसाहेब कुलट व ग्रामस्थ. (छाया - बबलू शेख)































जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## स्वयंरोजगाराच्या मागे लागा– डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

तरुण मित्रांनो, स्वातंत्र्याच्या प्रारंभी शिक्षण व नोकरी या गोष्टी एकमेकांशी जोडलेल्या होत्या. तेव्हाच्या जीवनात अभ्यास, संस्कार व प्रामाणिकपणा या गोष्टी मनावर बिंबवल्या गेल्या होत्या. आज फक्त पैसा, ओळख अन् मनगटी ताकद या तीनच गोष्टी समाजजीवनात महत्त्वाच्या!

आज शिक्षण व नोकरी यांची पूर्णपणे फारकत झालेली आहे. खरी गरज अशी आहे की, आजचे शिक्षण मुलांना स्वयंरोजगार कसा करता येईल याचं शिक्षण देऊन त्यासाठी प्रवृत्त करणारं हवं.

तुमच्या भोवतालच्या टाकाऊ वस्तूंतून कोणत्या नित्योपयोगी वस्तू तयार करता येतील, कोणते छोटे मोठे उद्योगधंदे तुम्ही सुरू करू शकाल, एखादा व्यवसाय, उद्योग सुरू करायचा तर त्यासाठी कोणत्या व किती ठिकाणाहून व कशा प्रकारे परवाने मिळवावे लागतात. रक्कम कशी उभारावी इ. शिक्षण आणि प्रोत्साहन मुलांना देतच नाही. आरक्षण पाहिजे शासकीय नोकऱ्यांसाठी अरे पण त्या असतात तरी किती?



आजची मुलं व पालक १००% गुण, स्पर्धा परीक्षा, पात्रता परीक्षा तसेच इतर काही परीक्षांच्या मृगजळामागे वेड्यासारखी धावताहेत. हे लॉटरी तिकीटामागे धावण्यासम आहे. याचा खरा व मोठा आर्थिक लाभ घेतात क्लास चालवणारे. त्यांच्यासारखे कौशल्य व गरज ओळखून स्वयंकौशल्य व रोजगाराच्या मागे लागावे.

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१

# विजेचा शॉक बसून महिलेचा मृत्यू

नगर – नागरदेवळे (ता. नगर) शिवारातील आईस्क्रीम फॅक्टरीत काम करत असताना विजेचा शॉक बसून वृध्द महिलेचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि.१२) दुपारी घडली आहे. चंदाबाई राजेंद्र दुसुंगे (वय ४५, रा. कापुरवाडी ता. नगर) असे मयत वृध्द महिलेचे नाव आहे.



चंदाबाई दुसुंगे (मयत)

नागरदेवळे शिवारातील शेलार मळ्यात आईस्क्रीम फॅक्टरी आहे. तेथे चंदाबाई दुसुंगे कामाला होत्या. त्या बुधवारी फॅक्टरीत काम करत असताना त्यांना विजेचा शॉक लागला. त्यांना उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात दाखल करण्यात आले असता उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे तेथील डॉक्टरांनी घोषीत केले. तशी माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ. विशाखा शिंदे यांनी भिंगार कॅम्प पोलिसांना दिली. पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास पोलीस अंमलदार पी. ए. बारगजे करत आहेत.

मयत चंदाबाई यांच्या पश्चात पती, दोन मुले, सून असा परिवार आहे.

# एसटी बसच्या वाहकाला मारहाण करत तिकिट मशीन फोडले

**झोपटी कॅन्टीनसमोरील घटना; एकावर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

नगर – एसटी बसच्या वाहकाला मारहाण करून त्यांच्याकडील ए.टी.आय.एम. मशीन फेकून देत नुकसान केल्याची घटना नगर – मनमाड महामार्गावरील झोपटी कॅन्टीनसमोर घडली. संकेत सखाराम कोळेकर (वय २९, रा. शिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड) असे मारहाण झालेल्या वाहकाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रोहित प्रकाश सोनवणे (वय ३४, रा. ढवणवस्ती, तपोवन रस्ता, सावेडी) असे गुन्हा दाखल झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. कोळेकर व त्यांचे सहकारी चालक पोपट चंदु केंगार हे त्यांच्या ताब्यातील सांगली ते शिर्डी ही बस (क्र.एमएम १४ बीटी ४७२७) घेऊन नगरमार्गे जात असताना झोपटी कॅन्टीनसमोर बस थांबवून वृध्द व्यक्ती उतरले. या ठिकाणी बस थांबून वृध्दाला उतरवल्याचे कारणावरून रोहित सोनवणे याने वाहक कोळेकर यांच्यासोबत हुज्जत घातली. शर्टची कॉलर पकडून शिवीगाळ केली. धक्काबुक्कीकरून खाली पाडले. मारहाण करून तिकीट काढण्याचे ए.टी.आय.एम. मशीन हातातून ओढून बसमध्येच खाली फेकून नुकसान केले.

दरम्यान हा प्रकार बसमधील इतर प्रवाशांच्या लक्षात येताच त्यांनी सोनवणेला मारहाण करून पकडून ठेवले. बस तारकपूर आगारात आणली व तोफखाना पोलिसांना फोन करून माहिती दिली. वाहक कोळेकर यांनी पोलीस ठाण्यात येऊन फिर्याद दिली.

पोलिसांनी सोनवणे विरोधात सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.

## हिवरे बाजार येथील बनाभाई सय्यद यांचे निधन



नगर – आदर्श गाव हिवरे बाजार येथील राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक असलेले बनाभाई चांदभाई सय्यद (वय ९२) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. ते मुस्लीम समाजातील असूनही पंढरपूर, आळंदी, देहू नियमित वारी करत असून ते पांडुरंगाचे व माऊली ज्ञानेश्वरांचे निस्सीम भक्त होते. गावातील भजनी मंडळात ते नेहमी सक्रीय होते. त्यांचा नातू निसार व हुसेफ हे दोघे आजही हनुमान चालीसा व भजनात असतात. तसेच त्यांचा मुलगा हबीब सय्यद गावात काम करत असतात. म्हणून ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून मशिदीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्यांच्या पश्चात मुलगा रहेमान, हबीब व मुलगी जायदा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. हिवरे बाजारच्या राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक हरपले असल्याची भावना पद्मश्री पोपटराव पवार यांनी व्यक्त केली.

## रोहिणी भांबरकर यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – सावेडी, महाराष्ट्र बँक कॉलनी, शिंदे मळा येथील रहिवासी सौ.रोहिणी दत्तात्रय भांबरकर (वय ५२) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. उद्योजक दत्तात्रय तबाजी भांबरकर यांचे त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन मुली, सूना नातवंडे असा परिवार आहे.

# महामार्गावर अर्धवट मोडलेला विद्युत खांब ठरतोयं धोकादायक

**महावितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे जीवीत आणि वित्तहानीचाही धोका**

नगर – पावसाळ्या पूर्वी महावितरणने विद्युत खांब रोहित्रांना विद्युत तारा, उघडया डिपी यांना अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांद्या, लोंबकळत असणाऱ्या तारा दुरुस्ती करावयास हव्यात जेणे करून कुठल्याही प्रकारच्या जीवीतहानी वित्तहानी होता कामा नये अशा प्रकाराचे आदेश दरवर्षी आपत्ती व्यवस्थापनाकडून देण्यात येतात परंतू गेंड्याची कातडी ओढलल्या महावितरणचे अधिकारी सोंग घेऊन झोपी जातात अशी नेहमीच सार्वत्रिक चर्चा होत असते वसूलीला प्रथम आणि सर्वसामान्य माणसाला कामासाठी हेलपाटे मारायला लावणारे कोठे काही वित्तहानी, जीवीतहानी झालीच तर ठेकदार किंवा सर्वसामानांच्या माथी मारून स्वतः धुतल्या तांदळा सारखे फिरतात. या सर्व गोष्टींचा त्यांना काहीच फरक पडत नाही. सोशल मिडियावर सामाजिक कार्यकार्ये कर्त्यांनी, वृत्तपत्रामध्ये बातम्या छापून आल्यानंतर त्यांची पळापळ म्हणजे वराती मागून घोड अशीच अवस्था दिसते. लाईट वाचून अख्ख शहर वेठीस धरले जाते. मग कोणी फोन उचलत नाही. लाईट गेल्यानंतर त्यांचा फोन कायमच व्यस्त लागतो. चुकून उचला तर उडाउडवीची उत्तरे तयारच असतात. त्यांना जनतेचे हाल झाल्याच कोणतेच सोयरे सुतक नसते ना देणे घेणे असते.

नगर – दौंड महामार्गावर हिवरे झरे येथे महावितरणच्या निष्काळजीपणाची साक्ष देत गेल्या अनेक दिवसांपासून विजेचे खांब अंत्यत दयनीय अवस्थेत उभे आहेत.

रोजच पाठीवरील निळ्याभोर आकाशास साक्षी ठेवत महावितरणच्या गेंड्याची कातडी ओढलेल्या अधिकाऱ्यांना ठणकावून सांगत आहे की 'मोडून पडला संसार सारा तरी मोडला नाही कणा, पाठीवरती हात ठेवून, साहेब लढ फक्त म्हणा'. लवकरात लवकर अधिकाऱ्यांना सद्बुद्धी द्यावी आणि हा विद्युत खांब भविष्यात महामार्गावर कोसळून कोणतीही जीवीत किंवा वित्तहानी होऊ नये अशी अपेक्षा ग्रामपातळीवर होत आहे.



हिवरे झरे गावातील महामार्गावरील खांब. (छाया – अमित मन्यार)

## बाबुलाल शेख यांचे अल्पश: आजाराने निधन



नगर – छत्रपती शिवाजी महाराजरोड येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे माजी कर्मचारी, होलेवस्ती, भैरवनाथनगर (बन) येथील रहिवासी बाबुलाल चांदभाई शेख (वय ७७) यांचे ११ जून रोजी दुपारी अल्पश: आजाराने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, पाच भाऊ, एक बहीण, दोन मुले, दोन मुली, पुतणे, जावई, भाचे, नातवंडे असा परिवार आहे. मासुम, हसन, हुसेन, अल्लाबक्ष व आमीन शेख यांचे थोरले बंधू, मेजर राजमोहम्मद शेख व अकबर शेख यांचे वडील, श्रीरामपूर न.प.चे कर्मचारी दस्तगीर शेख, परवेज शेख व मुश्ताक शेख यांचे चुलते होत.

## श्रीमती सरस्वतीबाई कामुनी यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – शहरातील नेहरू मार्केट पाठीमागील भराड गल्ली येथील रहिवासी श्रीमती सरस्वतीबाई गोपाळराव कामुनी (वय ८३) यांचे १३ जून रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात अंबादास, शरद, प्रकाश, नरेश ही ४ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

## सौ. सुमन जाधव यांचे हृदयविकाराने निधन



राहुरी – येथील सौ.सुमन रावसाहेब जाधव (वय ८०) यांचे हृदयविकाराने दुःखद निधन झाले.

आंबी येथील प्रगतशील शेतकरी रावसाहेब भास्करराव जाधव यांच्या पत्नी, मराठा समाज बहुउद्देशीय विकास सेवा प्रतिष्ठान, श्रीरामपूर चे संस्थापक विलासराव जाधव, आंबीचे माजी सरपंच सतीश जाधव व रमेश जाधव यांच्या मातोश्री, राष्ट्रवादी युवक काँग्रेस महाराष्ट्र राज्य सरचिटणीस राजदीपसिंह जाधव यांच्या आजी होत.

## जगजीतसिंग चुग यांचे दुःखद निधन



श्रीरामपूर – येथील राष्ट्रपतीपदक पुरस्कार विजेते, श्रीरामपूर नगर परिषदचे माजी उपनगराध्यक्ष, ट्रान्सपोर्ट व्यावसायिक स.जगजीतसिंग रामदास चुग (वय ८८) यांचे दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

स.राजन चुग (रणजितसिंग आहुजा), जसबिरसिंग चुग व लव्हली चूग यांचे वडील, श्रीरामपूर येथील गुदाव्दाराचे प्रमुख स.गुरुबचनसिंग चूग तसेच अमरिकसिंग, हरविंदरसिंग, गुरुबक्षसिंग, मनजितसिंग व परमजितसिंग चूग यांचे चुलते, सँण्टी सेठी यांचे सासरे होत.

# स्मार्ट विद्युत मीटरची सक्ती म्हणजे जनतेच्या 'आर्थिक शोषणाचा घाट'

**'स्मार्ट मीटर'च्या विरोधात नगर शहरात मोठे आंदोलन उभारण्याचा आम आदमी पार्टीचा निवेदनाद्वारे इशारा**

नगर – महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (एमएसईडीसीएल) द्वारे संपूर्ण महाराष्ट्रात स्मार्ट विद्युत मीटर लावण्याची करण्यात आलेल्या सक्तीला आम आदमी पार्टीच्या वतीने विरोध दर्शविण्यात आला आहे. सदरचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन आपच्या वतीने जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ व विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर यांना देण्यात आले.






स्मार्ट विद्युत मीटर बसवण्याचा निर्णय रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन आपच्या वतीने जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ व विद्युत महावितरणचे अधीक्षक अभियंता प्रकाश खांडेकर यांना देण्यात आले.

यावेळी अहमदनगर शहर जिल्हाध्यक्ष भरत श्रीराम खाकाळ, शेतकरी आघाडी अध्यक्ष काकासाहेब खेसे, महिला आघाडी अध्यक्ष ॲड. विद्या शिंदे, जिल्हा महासचिव इंजि. प्रकाश फराटे, उपाध्यक्ष अंबादास जाधव, प्रतीक म्हस्के, अनुसूचित जाती–जमाती आघाडी अध्यक्ष तुकाराम भिंगारदिवे, महासचिव दिलीप घुले, मच्छिंद्र आर्ले आदी उपस्थित होते.

स्मार्ट विद्युत मीटरची करण्यात आलेली सक्ती राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक शोषण करण्याचा घाट शासनाने घातला असल्याचा आरोप आपचे शहर जिल्हाध्यक्ष भरत खाकाळ यांनी केला आहे. खाकाळ म्हणाले की, स्मार्ट विद्युत मीटरची निर्मिती व जोडण्याची किंमत सहा हजार रुपये प्रति मीटर अपेक्षित आहे. मात्र या मीटरच्या किमतीत दुप्पट वाढ करून १२ हजार रुपये प्रति मीटर दराने नागरिकांकडून वसुल करण्यासाठीचे कंत्राट खाजगी कंपन्यांना देण्यात आले आहे. भांडवलवादी कंपन्यांना फायदा व्हावा, या हेतूने शासनाने ही योजना आखली आहे. ग्राहकांना प्रीपेड स्वरूपात विद्युत बिलाचे पैसे भरून ठेवण्यास भाग पाडून, महाराष्ट्राच्या जनतेचे आर्थिक शोषण करू पाहणाऱ्या बोगस विद्युत स्मार्ट मीटर योजनेला आम आदमी पार्टी विरोध करीत असल्याचे त्यांनी म्हंटले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने अहमदनगर शहरात स्मार्ट विद्युत मीटर बसवण्यास सुरुवात केल्यास आम आदमी मोठे जनआंदोलन करणार असल्याचा इशारा आपच्या वतीने भरत खाकाळ यांनी दिला आहे.

भारत सरकारकडून ऑगस्ट २०२१ मध्ये हा कायदा भांडवलदारी कंपन्यांना फायदा व्हावा या हेतूने पारित केल्याचे निदर्शनास येत असून जनतेवर वाढीव बोजा टाकण्याचे षडयंत्र २०२१ पासून नियोजित होते.

२० किलो व्हॅट किंवा २७ हॉर्स पॉवर पेक्षा कमी विद्युत दाब असणारे विद्युत उपभोक्ता म्हणजेच सर्वसामान्य कुटुंबे, गोरगरीब जनता, शेतकरी, लघु उद्योजक, व्यावसायिक यांच्या वर जाणीवपूर्वक अन्यायकारक धोरण ठरवून घेतलेला हा निर्णय आहे.

मार्च २०२५ पर्यंत विद्युत स्मार्ट मीटर लावण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न असून यातून फक्त आणि फक्त जनतेचे नुकसान आहे. केंद्र सरकारची भूमिका ही जनहित विरोधी व भांडवलदार स्नेही आहे. भारतात २२ कोटी २३ लाख विद्युत मीटर बदलायचे सरकारचे उद्दिष्ट असून त्यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांचे आर्थिक शोषण होणार आहे. त्यास आम आदमी पार्टीचा विरोध आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

# महेश नागरी पतसंस्थेच्या संचालक मंडळ निवडणुकीत वैशाली बोरा व अंजली शिंगवी यांची बिनविरोध निवड

**महिला राखीवच्या २ जागा बिनविरोध; सर्वसाधारण मधूनही तिघांची माघार**

नगर – भिंगार येथील महेश नागरी सहकारी पतसंस्थेच्या महिला राखीवच्या २ जागांसाठी दाखल असलेल्या ३ उमेदवारी अर्जांपैकी साधना विनोद पोखरणा यांनी शुक्रवारी (दि.१४) निवडणुकीतून माघार घेतल्याने या मतदार संघात वैशाली वर्धमान बोरा व अंजली नितीन शिंगवी यांचेच अर्ज शिल्लक राहिल्याने या दोघींची बिनविरोध निवड झाली आहे. या बाबतची अधिकृत घोषणा अद्याप बाकी आहे. या शिवाय सर्वसाधारण मतदार संघातूनही तिघांनी माघार घेतली आहे.





लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ३१ मे पर्यंत राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती दिली होती. मात्र आता ही स्थगिती उठविण्यात आली असून, ७ जूनच्या शासन निर्णयानुसार ज्या संस्थांच्या निवडणुका ज्या टप्प्यावर थांबविण्यात आल्या होत्या त्या टप्प्यापासून निवडणुकांचे पुढील कामकाज सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार महेश नागरी सहकारी पतसंस्था, भिंगार या संस्थेच्या नामनिर्देशन पत्र माघारीच्या टप्प्यावर स्थगित करण्यात आलेला निवडणुकीचा पुढील कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

सुधारित निवडणूक कार्यक्रमानुसार १३ ते २७ जून या कालावधीत उमेदवारांना माघारीची मुदत देण्यात आली आहे. निवडणुकीतील अंतिम उमेदवारांची यादी २८ जून रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर ७ जुलै रोजी मतदान घेण्यात येऊन त्याच दिवशी निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

संस्थेच्या सर्वसाधारण मतदार संघात १२ जागांसाठी १८ अर्ज दाखल आहेत. त्यातील बिपिनचंद्र बन्सीलाल लुणिया, प्रमोद माणचंद मुनोत, विनोद चंपालाल पोखरणा या तिघांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता १२ जागांसाठी १५ जणांचे अर्ज शिल्लक राहिले आहेत. महिला राखीवच्या २ जागा बिनविरोध झाल्या आहेत. अनु. जाती जमातीच्या १ जागेसाठी २ अर्ज, इतर मागासवर्गीयच्या १ जागेसाठी २ अर्ज व वि.जा.भ.ज. किंवा विशेष मागास प्रवर्गच्या १ जागेसाठी ३ अर्ज शिल्लक आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अल्ताफ शेख हे काम पाहत असून त्यांना संस्थेचे व्यवस्थापक राजेंद्र मेहेर हे सहाय्य करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### हिवाळ्यात गुळाचा चहा आरोग्यदायी

हिवाळ्यात गुळाचा चहा पिण्याने रक्तातील मेटाबॉल्जिम व्यवस्थित राहण्यास मदत मिळते. गुळाचे सेवन केल्याने रक्त शुद्ध होते. तसेच रक्तातील मेटाबॉल्जिम व्यवस्थित राहण्यास मदत होते. तसेच रक्ताशी संबंधित सर्व आजार नष्ट होण्यास मदत होते. विशेष म्हणजे गूळ रक्तामध्ये लगेच मिसळत नाही. त्यामुळे मधुमेह होण्याचा धोका कमी होतो. सर्दीपासून मिळते मुक्ती. गूळ हा उष्ण पदार्थ आहे.

त्यामुळे हिवाळ्यात गुळाचा चहा प्यायल्याने थंडी वाजत नाही. तसेच त्यामुळे हिवाळ्यात थंडीमुळे होणाऱ्या सर्दी–पडशापासून आपला बचाव होतो. हिवाळ्यात नाक बंद झाल्यास गुळाचा चहा प्यावा. त्यामुळे तुम्हाला नक्की फायदा होईल.

## पाककला

### गुजराथी मैसूर

**साहित्य** – बेसन पीठ एक कप, साखर पाऊण कप, तूप दीड कप, पाणी पाकासाठी एक तृतीयांश कप, दूध एक टेबलस्पून, तूप, रवा काढण्यासाठी दोन चहाचे चमचे, एक चमचा वेलदोडे.

**कृती** – दूध व दोन चमचे तूप एकत्र करून डाळीच्या पिठाला हाताने चोळावे. रव्याच्या चाळणीने चाळावे. एक कप पिठाचे अर्धा कप रवा होतो. मेसूर दुपारी करावयाचा असेल तर सकाळी असा रवा करून घ्यावा. मैसूर करावयाच्या वेळी प्रथम हा रवा दोन चमचे तुपावर गुलाबी भाजावा. साखरेचा दोनतारी पाक करावा. त्यात भाजलेला रवा घालून दोन मिनिटे ढवळावे. मग त्यावर कडकडीत गरम केलेल्या दीड कप तुपाची धार करून मिश्रण ढवळत राहावे. थोडा वेळाने मिश्रण पितळी चाळणीत ओतावे. त्यावर गार पाण्याचे शिंतोडे शिंपडावे म्हणजे जाळी चांगली सुटते. वड्या कापून कोमट असतानाच काढाव्यात.

## वास्तू

### शुभ प्लॉट

पश्चिम दिशा उंच व ईशान्य–पूर्व खोल असेल किंवा आग्नेय दिशा उंच व नैऋत्य–उत्तर दिशेला उतार असेल तर असा प्लॉट शुभ असतो.

## सल्ला

खोकला येत असल्यास मिरी, सुंठ, पिंपळी यांचे चूर्ण मधातून द्यावे.

## सौंदर्य

* बदाम, गुलाबाची फुले, चारोळी व उगाळलेले जायफळ रात्री दुधात भिजवा. सकाळी वाटून त्याचे उटणे बनवा. यामुळे चेहऱ्यावरील डाग नाहीसे होतील.

* डोक्यावरील सर्व केस पुढे पाडून विंचरा, डोके डावीकडे झुकवून केस डावीकडे पाडून व उजवीकडे डोके करून केस उजवीकडे पाडून विंचरावेत. यामुळे केसांची मुळे बळकट होऊन केस चमकदार व निकोप होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## दैनिक पंचांग

**शनिवार, दि. १५ जून २०२४**

–––, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, उत्तरा ०८।१४

सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.

**राशिभविष्य–**

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक क्षेत्रात अपयश येणार नाही याकडे लक्ष द्या.

**वृषभ** : नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील. आर्थिक विवादातून नुकसान संभव. कामात मित्रांचा सहयोग मिळेल.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर करा. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या फायद्यात नुकसान होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ** : देण्या–घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चालवावीत. नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.

**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल. तब्येत सांभाळा.

**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल. व्यापाराच्या विस्तारासाठी जास्त प्रयत्न करावे लागतील.

**कुंभ** : हितशत्रुंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट–कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. आध्यात्मिक आनंदही आज आपल्या जीवनात भरून राहील. कौटुंबिक जीवनात सुख समृद्धि राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

## शब्दगंध क्र. ६९४५ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ■ | ३ | ४ | | ५ |
| ६ | | ■ | ७ | | | ■ | |
| ८ | | ■ | ९ | | ■ | १० | |
| | ■ | ११ | | ■ | १२ | | |
| १३ | १४ | | ■ | १५ | | ■ | ■ |
| ■ | १६ | | १७ | ■ | ■ | १८ | ■ |
| १९ | ■ | ■ | २० | | २१ | | २२ |
| २३ | | | | ■ | २४ | | |

**शब्दगंध क्र. ६९४४ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उं | ब | र | ■ | भ | य | भी | त |
| ब | ळ | ज | ब | री | ■ | ती | न |
| र | ■ | ब | ना | व | ट | ■ | म |
| ठा | म | ■ | र | ■ | क | र | णी |
| ■ | स | रा | स | री | ■ | हि | ■ |
| ओ | ण | म | ■ | त | ल | वा | र |
| ल | व | ■ | पा | ■ | ■ | सी | मा |
| ■ | ट | पा | ल | ■ | बी | ■ | ■ |

**आडवे शब्द :–** १) जीत; यश; सफलता ३) समुद्र; मर्यादा; अंत ६) घोड्याच्या किंवा वहाणाच्या टाचेला मारतात तो लोखंडाचा अर्धचंद्राकृती तुकडा ७) डोळ्याचे केस; डोळ्यावरचे कातडे ८) हाक; बोलावणे ९) रर; रडगाणे १०) एक प्रकारची चिकण माती ११) कमी करणे; वजा १२) जंगल; रान; अरण्य १३) जवळ; नजीक १५) अयोध्येचा राजा; सीतापती १६) मुस्लिमांची प्रार्थना २०) हातचलाखी; पहाऱ्याखाली ठेवणे २३) करणारा, करविणारा २४) साहित्य; वस्तू; तपस्या

**उभे शब्द :–** १) प्रयत्न न करता २) लवकर; ढग; मेघ ३) उडीद वगैरेच्या पिठाची लाटून केलेली चकती जी भाजून अथवा तळून खाल्ली जाते ४) राजाची बायको; क्वीन ५) भरपूर; खूप; पुष्कळ ७) उपास सोडणे; समाधान १०) ऐट; रुबाब ११) भाषेचा एक अलंकार; एक दाक्षिणात्य खाद्यपदार्थ १२) कार्य: काज १४) मास; बारा राशींपैकी एक १७) प्रजा; रयत १८) अख्खा; संपूर्ण १९), किरकोळ नसलेले घाऊक २१) धरणी; धरित्री; पृथ्वी २२) गरीब; रंक

**फिल्मीचक्कर क्र. ११४२ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | न | सा | य | बा | सु | न | ■ |
| हा | य | र | ■ | व | ■ | सी | मा |
| ग | न | ■ | ते | री | ■ | ब | ■ |
| न | ■ | ते | रे | ■ | ■ | ■ | सं |
| ■ | क | ■ | पा | प | का | अं | त |
| रा | म | ■ | य | ■ | ला | गू | ■ |
| ह | ल | च | ल | ■ | स | र | ला |
| ■ | ■ | ल | ■ | कॉं | च | ■ | या |

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : फुलाच्या पाकळ्या तोडणाऱ्याला फुलाचे सौंदर्य कधीच आस्वादता येत नाही.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### पानात काहीतरी खायला देऊन, व्यक्तीजवळच्या वस्तू, चोर लांबवतात; हे खरे आहे काय?

रेल्वेत शेजारी दोन–तीन लोक येऊन बसतात, ओळख होते व गप्पा रंगतात. नंतर यात्रेला गेल्याचे सांगून ते लोक प्रसाद खायला देतात किंवा विडा खायला देतात. नंतर तुमच्याजवळचे सामानसुमान चोरून पलायन करतात. अशा बातम्या वृत्तपत्रात तुम्ही वाचल्या असतील. खरेच असे होते का?

काही विषपदार्थ असे आहेत की जे वर उल्लेखल्याप्रमाणे वापरले जातात. धोतऱ्याचे झाड तुम्ही पाहिले असेल. हे झाड विषारी असते, पण त्यातही फळ व बिया जास्त विषारी असतात. या बियांमध्ये लिव्होहायोसॅमीन, हायोसीन वा स्कोपोलामीन तसेच ॲट्रोपीन नावाचे घटक असतात. बिया व फळे खाल्ल्याने व्यक्ती हाडासारखी शुष्क, बीटासारखी लाल, गरम व भिजवलेल्या कोंबडीसारखी वेडपट बनते; असे गमतीने म्हटले जाते. या विषबाधेत घसा व तोंड कोरडे पडते, बोलता येत नाही, गिळता येत नाही, बुब्बुळे मोठी झाल्याने नीट दिसत नाही, माणूस दारू प्यायल्यासारखा चालतो, झोपाळू बनतो, विचित्र वर्तन करतो. १०० ते १२५ बिया खाल्ल्यास प्रौढ व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो. वर उल्लेखलेली लक्षणे पाहिल्यावर चोर याचा का उपयोग करत असतील हे लक्षात यायला वेळ लागणार नाही. पानातून, खाद्यपदार्थातून वा द्रवपदार्थातून या बियांची पावडर दिल्यास त्या व्यक्तीत उपरोक्त लक्षणे दिसून येतात. त्यांच्या जवळच्या वस्तू पळवणे मग खूप सोपे असते. बरं, त्यानंतर त्यांना धड सुसंबद्धपणे काही बोलू शकत, ना नीट चालू शकत. क्वचित प्रसंगी दारू प्यायलाय असे वाटून लोक वा पोलीसही त्याच्याकडे दुर्लक्षच करतात. म्हणूनच हुशार चोर या विषाचा वापर करतात व पलायन करतात. अशा विषबाधेमध्ये पोटात गेलेले विष उलट्या करून बाहेर काढण्याचा प्रयत्न करावा. दवाखान्यात नळीने पोटात पोटॅशियम परमँगनेट वा टॅनिक ॲसिड टाकून नंतर पोटातील विष त्याच नळीने बाहेर काढले जाते. निओस्टीग्मीनसारखे विशिष्ट औषधही उपयोगी ठरते.

आता लक्षात आले का, आई–बाबा असे का सांगतात की, प्रवासात कोणी काही दिले तर खाऊ नका ते?

## सुसरीची साखर–पेरणी

एका नदीत खूप सुसरी राहत होत्या. त्या नेहमी मेल्यासारख्या एका ठिकाणी पडून राहत, आणि कोणी प्राणी पाणी पिण्यास आला, की क्षणात झडप घालून त्याला जबड्यात पकडून ठार मारुन खाऊन टाकीत.

असेच एकदा एक सुसर मेल्याचे सोंग घेऊन पाण्याखाली स्वस्थ पडून होती. तेवढ्यात पाणी पिण्यासाठी एक कुत्रा तेथे आला. येथे थोडे, तिथे थोडे, अशा प्रकारे पाणी पीत तो आपली तहान भागवू लागला. हे सावज काही आपल्या तावडीत सापडत नाही, असे पाहून ती सुसर पाण्यावर डोके काढीत म्हणाली,

''अरे मित्रा, एका ठिकाणी उभा राहून पाणी पी. घाई करुन पाणी प्यालास, तर तुला ठसका लागून आजारी पडशील की. हे बघ, माझ्याजवळ चांगले निर्मळ पाणी आहे. ये येथे. आज किती दिवस झाले, मला तुझ्याशी मैत्री करावी वाटते. तुझा स्वभाव फार चांगला आहे, असेही मला कळले. ये असा जवळ, म्हणजे तुला कडकडून भेटता तरी येईल.''

सुसरीची ही साखर–पेरणी ऐकून कुत्रा लांबूनच म्हणाला,

''बाई तुला लांबूनच नमस्कार करतो. खरे म्हणशील, तर तुझ्यामुळेच मला असे ठिकठिकाणी थोडे थोडे पाणी प्यावे लागते. कधी झडप घालून तू माझा मुडदा पाडशील, याचा काय नेम? तुझी मैत्री तुलाच लखलाभ होवो.'' असे म्हणत कुत्रा तेथून धूम पळाला.

**तात्पर्य :** इतरांच्या गोड बोलण्याला भाळू नये. आधी त्यातील खरे खोटेपणा पहावा.

## जीवन चक्र



आपल्या नोकरी व्यवसायाच्या ठिकाणी जाणे येणे दरवेळी आपल्या क्रोधाला भडकवते. सुरळीत असणारी वाहतुक अचानक काही कारणाने थांबते व आपण एकाच ठिकाणी दहा–पंधरा मिनिटे थांबतो. कोणी आपल्याला आपल्या वाहनाचा मार्ग बदलू देत नाही. आणि आपला बाहेर पडण्याचा मार्ग निघुन जातो. दुसरा वाहन चालक अचानक आपल्या गाडीला कट देऊन निघून जातो. आणि दुर्घटना होता होता आपण त्यातून वाचतो. जेव्हा आपण आपल्या कार्यस्थळी पोहचतो तेव्हा आपण तणावग्रस्त व क्रोधग्रस्त झालेले असतो. असे वाटते की, आयुष्य अशा दुसऱ्या परिस्थितीद्वारे जी आपल्याला हलवून टाकते, ती आपणावर वार करण्यास तयार राहते. अशा क्रोधाचा काही उपाय आहे का? जैन परंपरेमध्ये शिकवण प्रदान करणारी एक कहाणी शिकवते की, क्रोधावर कसे नियंत्रण मिळवावे.

एके काळी, चार राजकुमार होते त्यांची नावे वासुदेव, बलदेव, सत्यक आणि दरूक अशी होती. एकदा ते घोड्यावर दाट जंगलात गेले उशीर झाल्यामुळे राजकुमारांनी निर्णय घेतला की रात्री ते जंगलात मुक्काम करून सकाळी परत जातील. त्यांनी वडाच्या झाडाखाली आराम करण्याचा निर्णय घेतला. ते जंगल घनदाट असल्याने एक एकाने पहारा करण्याचा विचार केला. म्हणजेच जेव्हा तीन राजकुमार झोपतील तेव्हा चौथा उभा राहून पहारा करेल. थोड्या वेळाने पहारेदार आराम करेल आणि दुसरा राजकुमार पहारा करेल. प्रथम राजकुमार ज्याने पहारा केला त्याचे नाव दरूक होते. जेव्हा बाकी तीनही राजकुमार झोपलेले होते तेव्हा क्रोधाने प्रेताचे रूप धारण केले व ते दरूक जवळ आले. क्रोधाचे प्रेत म्हणाले, ''मला खुप भुक लागली आहे मी तुमच्या तीनही साथीदारांना खाऊ इच्छितो.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

## शुद्ध जीवन जीने के मंत्र

उस समय मैंने बाबा के सामने जीरे के खेत को इमर्ज किया और बाबा से श्वेत प्रकाश की किरणें लेकर खेत को देना प्रारम्भ किया। योग के शक्तिशाली वायब्रेशन से रोग आगे नहीं बढ़ा और अच्छी फसल पैदा हुई। यह मेरा पहला अनुभव रहा कि योग में रहकार हम जो संकल्प करते हैं उसमें बाबा जरुर सफलता दिलाते हैं। योग का प्रयोग मैंने बाजरे की फसल पर जून, २००८ में किया। कोई भी प्रकार की रासायनिक खाद और कीटनाशक दवाई का उपयोग किये बिना खेत में योग के प्रकम्पन देता रहा। रोज़ खेत में जाकर योग करता था। अमृतवेले भी फसल को बाबा के सामने इमर्ज कर सकारात्मक चिंतन करता था। इस तरह सतोगुणी याद के वायब्रेशन से फसल में भी ताकत भरती गई और सूक्ष्म में प्रकृति की भी सेवा हुई।

फसल अच्छी तैयार होकर लहराने लगी। फसल तैयार होने में १०–१५ दिन बाकी थे कि प्रकृति का तूफान आया। जोर–शोर से हवा का तूफान आया, खूब बारिश भी आयी। कई वृक्ष गिर गये लेकिन मेरी बाजरे की फसल वैसी की वैसी खड़ी रही, कुछ भी नुकसान नहीं हुआ। एक बीघा खेत में ३० मन बाजरा हुआ। वह बाजरा खाने में स्वादिष्ट था। यौगिक खेती से उत्पादित बाजरा दो साल के बाद आज भी खाने के योग्य है। इसमें कोई भी कीट नहीं आया।

फिर मैंने योग का प्रयोग सौंफ की फसल पर किया। सबसे पहले सौंफ के बीज को बाबा के (घर) सेन्टर पर भेजा। वहाँ राजयोगी ब्रह्माकुमारी बहनों ने योग शक्ति से चार्ज किया। उसके बाद बीज की खेत में बुआई की गई।

जब यह फसल ३–४ इंच की हुई तब प्रकृति का वातावरण ठीक नहीं था। बादल छाये हुए रहते थे। प्रकृति को ऊर्जा देने वाली सूर्य की किरणें फसल को नहीं मिल पा रही थी जिससे फसल पर सफेद दाग दिखाई देने लगे। उसके पत्ते भी सफेद दाग वाले हो गये। उस समय ज्ञानसूर्य शिवबाबा से शक्तिशाली किरणें ले फसल को सकाश व शक्ति दी तो ४–५ दिन के बाद पत्तों के सफेद दाग निकल गये और फसल एकदम चमकदार और हरी हो गयी। उसके बाद २–३ फुट की फसल होने पर ऊंझा सेवाकेन्द्र तथा हमारे गाँव की पाठशाला के

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**


## हसा आणि शतायुषी व्हा!

धर्मगुरू आपल्या श्रोत्यांना
'पापापासून दूर रहा' या विषयावर व्याख्यान देत होते.
'तुम्ही पाप केलेत तर तुमच्यावर देवाचा कोप होईल. इतक्या यातना होतील की दात एकमेकांवर घट्ट आवळून धरावे लागतील. यावर कुणाला काही विचारायचं आहे?'
श्रोत्यातील एक स्त्री उभी राहिली आणि म्हणाली,
'पण गुरुमहाराज मला तर अजिबात दात नाहीत.'
'त्यावेळी तुम्हाला कवळी देण्यात येईल.' धर्मगुरु म्हणाले.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

प्रेम हे केवळ भावनाशील नाही
ते एक सत्य आहे
संपूर्ण निर्मितीच्या मुळाशी
जो आनंद असतो
तो आनंद म्हणजेच प्रेम होय



**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

## स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

**क) क्लॅमिडिआ :** क्लॅमिडिआ या रोगाची लागण झालेल्या व्यक्तीशी लैंगिक संबंध केल्याने हा रोग होतो. याची लक्षणे गरमी रोगाप्रमाणेच असतात. परंतु त्याची तीव्रता कमी असते. त्यामुळे लागण झालेली स्त्री आपली दैनंदिन कामे व्यवस्थितरीत्या करू शकते. परंतु क्लॅमिडिआ आतमध्ये रोग वाढवतात. यामध्ये स्त्रीच्या योनिमार्गामधून चिकट स्राव जास्त प्रमाणात बाहेर येतो. तसेच मूत्रसंस्थेला संसर्ग होऊन लघवी करताना त्रास होतो. स्रावामध्ये क्लॅमिडिआचे जंतू आढळतात. यावर डॉक्सिसायक्लिन, ओफ्लोक्सॅसीन तसेच ॲझिथ्रोमायसिन ही अँटिबायोटिक जास्त प्रभावशाली असतात.

**ड) एड्स** (Aids) : हा रोग ह्युमन इम्युनो डिफिशियन्सी (HIV) या विषाणूपासून होतो. या विषाणूची लागण झालेल्या व्यक्तीशी लैंगिक संबंध झाल्यावर दुसऱ्या व्यक्तीला याची लागण होते. या विषाणूची लागण झाल्यानंतर शरीराची रोगप्रतिकार शक्ती हळूहळू कमी होते. या रोगाची लागण झाल्यावर सुरुवातीला फारसा त्रास होत नाही. पीडित व्यक्तीला कुठलीच लक्षणे जाणवत नाहीत. HIV ची बाधा झाल्यानंतर एड्स होण्यास सात ते दहा वर्षांचा कालावधी जातो. त्याचे दुष्परिणाम सर्व शरीरावर दिसतात. रुग्ण एकामागे एक वेगवेगळ्या रोगांना बळी पडतो. अशक्तपणा, भूक मंदावणे, अंगामध्ये बारीक ताप, नागीण, क्षयरोग असे विविध आजार रुग्णाला होतात. त्याच बरोबर योनीमध्ये सफेद स्रावाचे प्रमाण वाढते. योनीला वारंवार जंतुसंसर्ग होतो. HIV चे विषाणू शरीरामध्ये निर्माण होणाऱ्या प्रत्येक स्रावामध्ये असतात. परंतु रक्त, वीर्य व योनीतील स्राव यामध्ये जास्त प्रमाणात आढळतात. कधी कधी हा स्राव पूमिश्रित असतो. रक्तातून एलायझा तपासणी करून याचे निदान करता येते. हा रोग पूर्ण बरा होण्यासाठी कोणतेही औषध उपलब्ध नाही. त्याच्या विरुद्ध कार्य करणारी लस निर्माण झालेली नाही. त्यामुळे पती–पत्नीने एकमेकांशी एकनिष्ठ राहून सुरक्षित लैंगिक संबंध असू द्यावेत व HIV चा संसर्ग टाळावा.

**३) गर्भाशय व योनीचा कर्करोग :** गर्भाशय तसेच योनीचा कर्करोग झाल्यास पू व रक्तमिश्रित, दुर्गंधीयुक्त स्राव बाहेर येतो. गर्भाशयमुखावर बऱ्याच वर्षांची जुनी व मोठी जखम असेल व उपाय करूनही त्यातून वारंवार स्राव बाहेर येत असेल, तर कर्करोगाची लागण असण्याची शक्यता असते. बऱ्याचदा गर्भाशयमुखावर गाठ असते. तपासणी करताना त्या गाठीला किंचित धक्का लागूनही रक्तस्राव होत असेल, तर ती गाठ कर्करोगाची असू शकते. याचे निदान पॅपस्मिअर तपासणीद्वारे करता येते. कर्करोग असल्यास तातडीने गर्भाशयनिर्हरणाची शास्त्रक्रिया करावी. डॉक्टरांच्या सल्ल्याने किमोथेरपी करावी. साधारणत: चाळिशीनंतर श्वेतप्रदराचा त्रास होत असेल. तर डॉक्टरांच्या सल्ल्याने सर्व वैद्यकीय चाचण्या करून घ्यावात.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर मोबाईल नं– ८७९३४००४००

# एसा सभासदांच्या कल्पक्तेनुसार नगर शहर महानगराकडे वाटचाल करेल

### आयुक्त डॉ. पंकज जावळे यांचे प्रतिपादन; एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड २०२४ वितरण सोहळा

नगर - शहर बहुमजली इमारतीच्या माध्यमातून नावारूपाला येत असून विविध प्रकारची चांगली बांधकामे शहराचा चेहरामोहरा बदलण्यात एसा सभासदांचा मोलाचा वाटा आहे, त्यांच्या माध्यमातून शहराच्या सौंदर्यकरणात भर पडत असते, सर्वांच्या सहकार्यातून शहर विकासाला गती प्राप्त झाली आहे, शहरातील विविध भागात रस्त्यांची कामे हाती घेतली आहे, सभासदांच्या कल्पक्तेनुसार नगर शहर महानगराकडे वाटचाल करेल, एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्डच्या माध्यमातून आर्किटेक्ट्स इंजिनियर यांच्या कल्पकतेला वाव देण्यासाठी एसा असोसिएशनने बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड जाहीर करून हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले असे प्रतिपादन मनपा आयुक्त डॉ. पंकज जावळे यांनी केले.






एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड २०२४ पोवरड बाय पोलाद स्टील जालना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी डॉ. पंकज जावळे, राजेश कटारिया, जयेश मेहता, आशिष भाबडा, रमेश कार्ले, आदिनाथ दहिफळे, वैभव फिरोदिया, प्रथमेश सोनावणे, सुनिल औटी, विनोद काकडे, प्रितेश पाटोळे, मयुरेश देशमुख, उदय तरवडे, संकेत पादिर, यश शहा, इक्बाल सय्यद, मिनल काळे, एस. यू. खान, अजित माने, अनिल साळुंके, प्रल्हाद जोशी, रमेश छाजेड, देवेंद्रसिंग वधवा आदी. (छाया - लहू दळवी)

एसा बेस्ट स्ट्रक्चर अवॉर्ड २०२४ पॉवर्ड बाय पोलाद स्टील जालना पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी डॉ. पंकज जावळे, राजदीप बिल्डकॉनचे संचालक राजेश कटारिया, पोलाद स्टील कंपनीचे प्रेसिडेंट जयेश मेहता आणि व्हाईस प्रेसिडेंट आशिष भाबडा, अध्यक्ष रमेश कार्ले, उपाध्यक्ष आदिनाथ दहिफळे, खजिनदार वैभव फिरोदिया, प्रथमेश सोनावणे, सुनिल औटी, विनोद काकडे, प्रितेश पाटोळे, मयुरेश देशमुख, उदय तरवडे, संकेत पादिर, यश शहा, इक्बाल सय्यद, मिनल काळे, एस. यू. खान, अजित माने, अनिल साळुंके, प्रल्हाद जोशी, रमेश छाजेड, देवेंद्रसिंग वधवा तसेच सभासद आणि कुटुंबीय उपस्थित होते.

या स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे १) रेसिडेन्सीअल कॅटेगरी बंगलो बिलो २०० चौ मी. कांचन बंगला आर्किटेक्ट दीपक माने व टीम. २) रेसिडेन्सीअल कॅटेगरी बंगलो अबाउ २०० चौ मी. फ्रेमिंग द स्टोन - अजय दगडे व आर्की तुषार भामरे टीम. ३) रेसिडेन्सीअल कॅटेगरी ट्विन व रो हाऊस ग्रूप हाउसिंग - श्री दत्तनगर हाउसिंग स्कीम मकरंद देशपांडे व टीम. ४) रेसिडेन्सीअल कॅटेगरी ग्रूप हाउसिंग अपार्टमेंट - साई आनंद रेसिडेन्सी आर्किटेक्ट प्रितेश गुगळे व टीम. ५) कमर्शिअल कॅटेगरी - फन इन डोअर अमुजमेन्ट पार्क आर्की. मयुरेश देशमुख व टीम ६) सोशियल कॅटेगरी - वरद नेत्रालय आर्किटेक्ट वैभव देशमुख व टीम ७) इण्डस्ट्रीयल कॅटेगरी इंडिया क्यू ओ फुडस प्रा लि सुपा इंजि. सुभाष दहातोंडे उल्का प्रोजेक्ट्स प्रा लि व टीम. ८) ओपन कॅटेगरी - रामायण वाटिका आर्किटेक्ट मयुरेश देशमुख व टीम ९) आऊट साईड नगर कॅटेगरी - मेहेर ब्लिस आर्किटेक्ट प्रितेश गुगळे व टीम १०) आऊट साईड नगर क कॅटेगरी अपार्टमेंट ट वाघोली सुनिल औटी व टीम. ११) आऊट साईड नगर कॅटेगरी - विखे फॉर्म हाऊस संजय कटारिया, प्रेरणा कटारिया व टीम.

अहमदनगर शहर व महापालिका हद्दीत संस्थेच्या काम केलेल्या सभासदांनी त्यांचे प्रोजेक्ट या स्पर्धेत दाखल करून सहभाग नोंदवला होता. एकूण आठ कॅटेगरीमध्ये ५३ एंट्री दाखल केल्या होत्या. या स्पर्धेचे परीक्षक पदाचे काम आर्की. अरुण काब्रे, आर सी सी डिझाइनर मिलिंद राठी, पी एम सी कन्सल्टंट अजित टिपरे यांनी काम पाहिले. सर्व प्रोजेक्टचे प्रेझेंटेशन तसेच पी पी टी अथवा व्हिडिओ शूटिंग यासाठी सहभागी सभासदांनी दिले होते. आवश्यक कामांची त्यांनी साईट व्हीजीट केली, आणि विजेते जाहीर केले.

राजदीप बिल्डकॉनचे राजेश कटारिया यांनी सर्व विजेते आणि सहभागी सभासदांचे अभिनंदन करून संस्थेने आयोजित केलेल्या अश्या स्पर्धेच्या माध्यमातून एक चांगली स्पर्धा सभासदांमध्ये घडत असल्याचे सांगितले.

यावेळी पोलाद स्टील कंपनीने सभासदांच्या मुलांसाठी तारांगण दाखवण्याची व्यवस्था केली होती, तसेच फॅमिली फोटो साठी सेल्फी पॉइंटची व्यवस्था करण्यात आली होती.

संस्थेचे सभासद अजय दगडे यांनी हिंदी गीतांचा सुमधुर कार्यक्रम करून उपस्थितांचे मनोरंजन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वीणा दिघे यांनी केले तर समन्वयक अन्वर शेख यांनी उपस्थितांचे आभार मानले.



अहमदनगर व श्रीरामपुर येथील भनसाळी टिव्हिएसमध्ये अपाचे आरटीआर ब्लेझ ऑफ ब्लॅक सिरिजचे अनावरण झाले.

## अहमदनगर व श्रीरामपुर येथील भनसाळी टिव्हिएसमध्ये 'अपाचे आरटीआर ब्लेझ ऑफ ब्लॅक सिरिज'चे अनावरण

नगर - टिव्हिएस कंपनीने अपाचे बाईकचे अ ब्लेझ ऑफ ब्लॅक सिरीजचे लॉन्चिंग केले आहे. यावेळी भनसाळी टिव्हिएसचे अभिनंदन भनसाळी, जनरल मॅनेजर, तृप्ती कोंडा उपस्थित होते.

नवीन अपाचे आरटीआर १६० २ वॉल्व्ह आणि ४ वॉल्व्ह मध्ये उपलब्ध असुन डिजिटल अत्याधुनिक मीटर, ३ राईड मोड, एलईडी हेड लॅम्प डिआरएल सह, एमआयजी शॉकॲब्जॉबर, सिंगल चॅनल सह रोटोपेटल डिस्क, आकर्षक लुक, पॉवरफुल इंजिन, अधिक कार्यक्षमता, जबरदस्त पिकअप ही नवीन अपाचे आरटीआरची वैशिष्टये असुन अधिकाधिक लोकांनी सदर गाडी खरेदीसाठी भनसाळी टिव्हिएस, अहमदनगर व श्रीरामपुर येथील शाखेला अवश्य भेट द्यावी असे आवाहनही करण्यात आले. पॉवरफुल इंजिन आणि जास्त फिचर्स नवतरूणाईला नक्कीच आकर्षित करतील असे भनसाळी टिव्हिएसचे डायरेक्टर अभिनंदन भनसाळी यांनी बोलतांना सांगितले.

# मुलींचे यश समाजासाठी सकारात्मक गोष्ट

### अर्चना काळे यांचे प्रतिपादन

नगर - आज स्पर्धेचे युग असल्याने विद्यार्थ्यांनी त्याप्रमाणे नियोजन करुन आपले मार्गक्रमण केले पाहिजे. एक-एक मार्काला महत्व आल्याने विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे गरजेचे आहे. १० वी व १२ वी परिक्षेत गेल्या काही वर्षांपासून मुलींचे यशस्वी होण्याची प्रमाण मोठे आहे, ही समाजासाठी सकारात्मक गोष्ट आहे. या गुणवंतांचा सत्कार करुन त्यांच्या शैक्षणिक कार्यास प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न पतसंस्थेच्या माध्यमातून केला जात आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून सभासदांची आर्थिक पत सुधारण्याबरोबरच त्यांच्या गुणवंत पाल्यांना शिक्षण घेतांना अडचण येऊ नये यासाठी मदतीचा हात देण्यात येतो. गुणवंत पाल्य हे पतसंस्थेचा अभिमान आहे, असे प्रतिपादन चेअरमन अर्चना काळे यांनी केले.



पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन अर्चना काळे, व्हाईस चेअरमन दत्तात्रय डोळसे, संचालक किरण धारक, मनोज क्षीरसागर, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, बाळासाहेब हुचे, संजय धोकरिया, आशा चौरे, अभय काळे, दिपक भागवत, व्यंकटेश जोशी, कविता डोळसे, अमृता शिंदे.

### पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार

पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने सभासदांच्या गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन अर्चना काळे, व्हाईस चेअरमन दत्तात्रय डोळसे, संचालक किरण धारक, मनोज क्षीरसागर, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, बाळासाहेब हुचे, संजय धोकरिया, आशा चौरे, अभय काळे, दिपक भागवत, व्यंकटेश जोशी, कविता डोळसे, अमृता शिंदे आदि उपस्थित होते.

यावेळी कु.ऋचिता सातपुते, सर्वज्ञा डोळसे, कु.सिद्धी शिंदे, श्रावणी डोळसे, सई देवकर, गौरी काळे आदिंचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी व्हाईस चेअरमन दत्तात्रय डोळसे म्हणाले, पवन नागरी पतसंस्थेच्या माध्यमातून सभासद, कर्जदार, ठेवीदार यांच्या प्रगतीसाठी विविध योजना सुरु करण्यात आल्या आहेत. त्याच बरोबर विविध उपक्रमातून सामाजिक दायित्वही जपले जाते. आज सभासदांच्या गुणवंत पाल्यांनी मिळविलेले यश हे कौतुकास्पद असेच आहे. त्यांचा सत्कार केल्याने इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निशिकांत शिंदे यांनी केले तर आभार मनोज क्षीरसागर यांनी मानले

# पोस्टल कर्मचाऱ्यांच्या न्याय आणि प्रलंबित मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्नशील

### शिवाजी वसू रेड्डी यांचे प्रतिपादन; महाराष्ट्रातून नागपूरचे धनंजय राऊत यांची डेप्युटी जनरल सेक्रेटरीपदी निवड

नगर - नॅशनल असोसिएशन ऑफ पोस्टल एम्प्लॉईज ग्रुप सीचे सिल्वर ज्युबली अखिल भारतीय अधिवेशन श्रीक्षेत्र उज्जैन मध्यप्रदेश येथे ९ ते ११ जून दरम्यान झाले. देशभरातील विविध राज्यातील बाराशेपेक्षा तर महाराष्ट्रातील दिडशे सभासदांनी या अधिवेशनात सहभाग घेतला होता. अहमदनगर विभागातून टपाल कर्मचारी संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव यांचेसह कमलेश मिरगणे, तान्हाजी सुर्यवंशी यांनी सहभाग नोंदविला.

अधिवेशनाचा शुभारंभ श्रीमती प्रिती अग्रवाल पोस्टमास्तर जनरल इंदोर रिजन यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनिल झुंजारराव, निसार मुजावर, एन के त्यागी, डी किसनराव, पी एस बाबू हे उपस्थित होते. या मुख्य कार्यक्रमाचे प्रास्तविक शिवाजी वसू रेड्डी यांनी केले. या तीन दिवसीय अधिवेशनात टपाल कर्मचाऱ्याचा विविध समस्या, स्टाफ शॉर्टज,कॅनेक्टिव्हिटीमध्ये वारंवार येत असलेल्या अडचणी, पेन्शन योजना या प्रमुख विषयासह विविध प्रश्नांवर सविस्तरपणे चर्चा झाली.

पुढील दोन वर्षांकरिता रंजनकुमार तिवारी (वेस्ट बंगाल) यांची अध्यक्षपदी, शिवाजी वसू रेड्डी (आंध्रप्रदेश) यांची जनरल सेक्रेटरी तर महाराष्ट्राच्या वतीने धनंजय राऊत (नागपूर) यांची डेप्युटी जनरल सेक्रेटरीपदी, मनोजकुमार कौशिक (नवी दिल्ली) यांचे फायनान्शिअल सेक्रेटरी निवड करण्यात आली.



शिवाजी वसू रेड्डी (आंध्रप्रदेश) व धनंजय राऊत (महाराष्ट्र) यांची उज्जैन येथील राष्ट्रीय अधिवेशनात निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना महाराष्ट्रातील संघटनेचे प्रमुख पदाधिकारी.

धनंजय राऊत हे महाराष्ट्राचे डेप्युटी सर्कल सेक्रेटरी तर नागपूर पोस्टल व टेलीग्राम सोसायटीचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असून, त्यांची देशपातळीवर डेप्युटी जनरल सेक्रेटरी म्हणून निवड झाल्याने त्यांना राष्ट्रीय काम करण्याची संधी मिळाली आहे.

यावेळी बोलताना धनंजय राऊत यांनी सर्वांना धन्यवाद देत, आपण टाकलेल्या विश्वासास पात्र राहून, आपल्या न्याय व प्रलंबित मागण्यांसाठी व खास करून जुनी पेन्शन योजना सर्वाकरिता लागू करावी यासाठी खास आग्रही राहील, सभासद व प्रशासन यातील दुवा म्हणून निश्चितच प्रामाणिकपणे काम करील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी महाराष्ट्रातून अधिवेशनासाठी उपस्थित असलेले निसार मुजावर, सुनील झुंजारराव, आर एच गुप्ता, संतोष कदम, संदिप सैदांनी (ठाणे), संतोष यादव, कमलेश मिरगणे, तानाजी सूर्यवंशी (अहमदनगर), शिवाजी नवले, धनंजय शेंडगे (बीड), महादेव गोपाळघरे, रत्नाकर अभंग, कृष्णकांत तायडे, सदा नाईक, धनंजय इंगोले (मुंबई), योगेश सामडोलीकर, आनंद गवळी (कोल्हापूर) सूर्यकांत गुट्टे,संजय सनातन धाराशिव, राजेंद्र विश्वास विश्वास, शंकर राख(श्रीरामपुर), आशुतोष देशपांडे (नाशिक), मिलिंद निपाणकर (नागपूर), गणेश ठाकूर, भालचंद्र चव्हाण(धुळे), नंदू झलबा, सुनील गोहर (गोवा), महेंद्र कडु (पालघर) यांच्यासह सभासद उपस्थित होते.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्व सन्मान पुरस्कार अनिता काळे यांना प्रदान

नगर - मराठा समन्वय समितीच्या राज्य कार्याध्यक्षा तथा जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांना श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्व सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्व सन्मान पुरस्कार अनिता काळे यांना प्रदान करण्यात आला.

निमगाव वाघा (ता. नगर) येथे छत्रपती संभाजी महाराज, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंतीनिमित्त झालेल्या राज्यस्तरीय पाचव्या काव्य संमेलनात काळे यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल आणि महिलांच्या सर्वांगीन विकासासाठी सातत्याने कार्य करत असल्याने पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी विशेष सरकारी वकील ॲड. मनिषा केळगंद्रे-शिंदे, उद्योजक माधवराव लामखडे, काव्य संमेलनाचे संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, ज्येष्ठ कवी आनंदा साळवे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी सुभाष सोनवणे, माजी सरपंच साहेबराव बोडखे, कवी सरोज अल्हाट, गझलकार रज्जाक शेख, मिराबक्ष शेख, उद्योजक दिलावर शेख आदी उपस्थित होते.

अनिता काळे या सामाजिक क्षेत्रात मागील दोन दशकापासून सातत्याने सक्रीय योगदान देत आहेत. त्या जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका असून, सर्वसामान्य घटकातील मुला-मुलींना विद्यादानाचे पवित्र कार्य करुन शालेय मुलींना स्वसंरक्षणाचे धडे देण्यासाठी ज्युदो व लाठी-काठीचे प्रशिक्षण मोहिम चालवित आहे. महिला सक्षमीकरणाचे कार्य करुन उत्तम प्रकारे महिला संघटन केले आहे. व्याख्यानातून राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आणि विचार घराघरात पोहचवून सक्षम पिढी घडविण्याचे त्यांचे कार्य सुरु आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्तृत्व सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.



'श्री ज्ञानसरस्वती संगीत निकेतन' च्या यशस्वी विद्यार्थ्यांसमवेत संचालिका संपदा चौधरी.

## श्री ज्ञानसरस्वती संगीत निकेतनचे गायन-वादन परीक्षेत घवघवीत यश

नगर - अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ आयोजित शास्त्रीय गायन वादन परीक्षांच्या सत्र एप्रिल - मे २०२४ च्या निकालामध्ये दिल्लीगेट व पाईपलाईन रोड येथील 'श्री ज्ञानसरस्वती संगीत निकेतन' च्या विद्यार्थ्यांनी क्लासची उज्वल परंपरा कायम राखत संचालिका संपदा चौधरी यांच्या मार्गर्शनाखाली यश संपादन केले आहे.

निकाल पुढीलप्रमाणे : गौरांगराज आरगोंडा (प्रवेशिका प्रथम) हार्मोनियम विशेष योग्यतेसह केंद्रात तृतीय. पार्थ अभिजित ऋषी (प्रवेशिका पूर्ण) गायन -विशेष योग्यतेसह केंद्रात द्वितीय. रिद्धी दिनेश गांधी (प्रवेशिका पूर्ण) गायन - प्रथम श्रेणी सह केंद्रात चतुर्थ. ओजस अपूर्व गुजराथी (मध्यमा पूर्ण) सिंथेसायझर - प्रथम श्रेणी सह केंद्रात प्रथम. मनस्वी प्रकाश लगड (मध्यमा पूर्ण) गायन - प्रथम श्रेणीसह केंद्रात द्वितीय. दीप्ती दयावनपेल्ली (विशारद प्रथम) गायन-प्रथम श्रेणीत केंद्रात प्रथम.

# जागतिक रक्तदाता दिनानिमित्त (१४ जून)

१४ जून हा दिवस दरवर्षी जागतिक रक्तदाता दिवस म्हणून जगभर साजरा केला जातो. प्रसिद्ध ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ डॉ. कार्ल लँडस्टॅनर यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस साजरा केला जातो. A, B, O या रक्तगट प्रणालीचा शोध लावणाऱ्या या अलौकिक शास्त्रज्ञाचा जन्म १४ जून १८६८ साली ऑस्ट्रिया देशातील व्हिएन्ना शहरात झाला. त्यांनी १९०१ साली A, B, O रक्तगट प्रणालीचा शोध लावला की, जी आज जगभर वापरली जाते. या संशोधनासाठी त्यांना १९३० साली नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावर्षी जागतिक आरोग्य संघटनेतर्फे १४ जून २०२४ हा दिवस 20 years of celebrating giving : Thank you, blood donors! या संकल्पनेसह साजरा करण्यात येत आहे. दरवर्षी जगात रोज ८०० स्त्रिया बाळंतपणात रक्तस्त्रावामुळे मृत्युमुखी पडतात, तसेच जगामध्ये ६५ टक्के रक्त हे ५ वर्षाखालील मुलांना व स्त्रियांना लागते. त्यामुळे यावर्षीच्या 20 years of celebrating giving : Thank you, blood donors या संकल्पनेसह सर्वांनी आर्वजून अनेक माता व बालकांचे प्राण वाचविण्यासाठी रक्तदान करावे. २०२४ सालापर्यंत १००% स्वेच्छा रक्तदान जगभर व्हावे, असे W.H.O. चे उद्दिष्ट आहे. दरवर्षी जगात ११२.५ मिलियन एवढ्याा रक्तपिशव्या जमा होतात. यातील निम्मे रक्तदान हे श्रीमंत देशांत होते. जगातील ५७ देशांमध्ये १००% स्वेच्छा रक्तदान होते.

१८ ते ६५ या वयोगटातील ४५ किलोपेक्षा जास्त वजन असलेली कोणतीही निरोगी व्यक्ती ही वर्षातून चार वेळा रक्तदान करू शकते. परंतु रक्तदान करताना शासनमान्य व गुणवत्तेचे सर्व निकष पाळणाऱ्या रक्तपेढीतच तज्ज्ञ डॉक्टर्स व तंत्रज्ञांच्या देखरेखीखालीच रक्तदान करावे. रक्तदानाबद्दल अनेक समज-गैरसमज समाजात अजूनही प्रचलित आहेत. परंतु रक्तदान केल्यामुळे रक्तदात्यास कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही. उलटपक्षी रक्तदान केल्यामुळे शरीरात नवीन लालपेशी तयार होऊन त्यांची ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता वाढते. पर्यायाने रक्तदात्याचे आरोग्य सुधारते.

तसेच रक्तविघटनाच्या नवीन तंत्रज्ञानामुळे एका रक्तदात्याकडून जमा होणाऱ्या रक्तपिशवीचे - लाल पेशी, प्लाझ्मा व प्लेटलेटस् - असे विविध रक्तघटक तयार करता येतात. यामुळे एका रक्तदात्यामुळे तीन रुग्णांना मदत मिळू शकते. यामुळे समाजातील विविध घटकांनी, तरुणांनी व सामाजिक संघटनांनी या कामी पुढाकार घेऊन स्वेच्छा रक्तदान चळवळ पुढे नेली पाहिजे.



तसेच आपण जेव्हा आपल्या रुग्णासाठी एखादा रक्तघटक रक्तपेढीतून मागवत असू, त्यावेळी त्या रक्तपेढीत गुणवत्तेच्या सर्व निकषांचे पालन केले जाते की नाही, प्रशिक्षित डॉक्टर्स व तंत्रज्ञ २४ तास उपलब्ध आहेत किंवा नाही या गोष्टींची रुग्णाच्या नातेवाईकांनी खातरजमा करून घेणे गरजेचे आहे. तरी या दिनाचे औचित्य साधून आपण सर्वांनी रक्तदान चळवळीमध्ये सक्रिय होण्याचा संकल्प करावा, हे नम्र आवाहन.

**- डॉ. शैलेद्र पाटणकर,**
**प्रमुख, अष्टविनायक ब्लड सेंटर, अहमदनगर**

# समाजाच्या सदृढ आरोग्यासाठी नगर येथील आनंदऋषीजी हॉस्पिटलची आरोग्यदूतची भूमिका

## राजेंद्र भंडारी यांचे प्रतिपादन; बालरोग व थॅलेसिमिया तपासणी शिबिरास प्रतिसाद



जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग व थॅलेसिमिया तपासणी शिबिराचे उद्‌घाटन बनारसीबाई भंडारी यांच्या हस्ते झाले.

नगर – सर्व समाजाच्या सदृढ आरोग्यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल आरोग्यदूतची भूमिका पार पाडत आहे. नवजात बालकांपासून ते ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची काळजी येथे घेतली जाते. अतिदक्षता विभाग, सर्व आरोग्य सुविधांनी सज्ञ अद्यावत यंत्रणा व तज्ञ डॉक्टर समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा घेऊन जात असून, या सेवा कार्यात जोडले गेल्याचे समाधान मिळत असल्याची भावना उद्योजक राजेंद्र भंडारी यांनी व्यक्त केली.

जैन सोशल फेडरेशनद्वारा संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मोफत बालरोग व थॅलेसिमिया तपासणी शिबिराचे उद्‌घाटन बनारसीबाई भंडारी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी राजेंद्र भंडारी बोलत होते. यावेळी लिलाबाई भंडारी, संजय भंडारी, विजय भंडारी, रविंद्र भंडारी, चंद्रकांत भंडारी, संदीप भंडारी, सुमनबाई भंडारी, सचिन भंडारी, सागर भंडारी, विपूल भंडारी, आदित्य भंडारी, सुराज भंडारी, निरज भंडारी, लौकिक भंडारी, नमन भंडारी, धरमचंद भंडारी, रसिक भंडारी, नरेंद्र चोरडीया, अभिषेक बोथरा, यश गुगळे, अंजू भंडारी, सुधीर झालानी, संतोष बोथरा, प्रकाश छल्लानी, डॉ. प्रकाश कांकरिया, बाबू लोढा, माणकचंद कटारिया, डॉ. आशिष भंडारी, निखीलेंद्र लोढा, बालरोग तज्ञ डॉ. श्रेयस सुरपुरे, डॉ. रुपेश सिकची, डॉ. सोनाली कणसे, डॉ. वैभवी वंजारे, डॉ. लिझा बलसारा आदी उपस्थित होते.

पुढे उद्योजक राजेंद्र भंडारी म्हणाले की, सेवा कार्यात भंडारी परिवार नेहमीच योगदान देत आहे. आरोग्यसेवा समाजाच्या अंतिम घटकांपर्यंत पोहचविण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटल करत असून, या सेवा कार्यात भंडारी परिवाराचे योगदान राहणार असल्याचे सांगितले. तर कॅन्सरच्या प्रकल्पासाठी सहकार्य करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले की, भंडारी बंधूंनी वडिलांची पुण्यतिथी आरोग्य सेवेच्या उपक्रमाने साजरी करुन गरजूंना आधार देण्याचे काम केले आहे. उच्च सुशिक्षित असलेला हा परिवार सेवा कार्याशी जोडला गेलेला आहे. केमिकल इंडस्ट्रीजमध्ये जगभरात त्यांचे नाव आहे. हॉस्पिटलमध्ये ना नफा, ना तोटा या तत्वावर आरोग्यसेवा सुरु असून, हा परिवार या सेवेशी जोडल्या गेल्याने विविध प्रकल्पाला हातभार लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सुमनबाई भंडारी म्हणाल्या की, स्व. हेमचंद भंडारी यांनी मोठ्या कष्टाने विश्व निर्माण केले. परिस्थितीची जाणीव ठेऊन गरजू घटकांना नेहमीच त्यांनी मदतीचा हात दिला. त्यांच्या संस्काराने भंडारी परिवार सेवाकार्यात योगदान देत आहे. ते ज्या थॅलेसिमिया या आजाराने ग्रासले त्याच आजाराचे शिबिर घेऊन सामाजिक योगदान देण्यात आले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. श्रेयस सुरपुरे म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये अद्यावत एनआयसीयू सेंटर कार्यान्वीत असून, अल्पदरात सेवा दिली जात आहे. पुणे सारख्या शहरातून देखील सर्वसामान्य कुटुंबातील बालके उपचारासाठी दाखल करण्यात आली आहे. मोठ्या शहरातील खर्चिक आरोग्य सुविधा परवडत नाही, त्याच दर्जाची आरोग्य सुविधा आपल्या शहरात अल्पदरात उपलब्ध होत आहे. २६ बेडच्या अद्यावत एनआयसीयू विभागात नवजात बाळाच्या श्वासोच्छवासाच्या त्रासावर उपचार, बालदमा ए.आर.डी. एस. (श्वसनदाह), नवजात बालकांच्या कावीळीसाठी फोटोथेरपी व रक्त बदलण्याची सुविधा, अनुवंशिक आजार, जन्मजात आजारांचे निदान व उपचार, बालदमा तसेच लहान मुलांचे टू डी इको, एक्स रे, पॅथोलॉजी लॅब व डायलिसिस मशीन द्वारे सेवा उपलब्ध आहे. महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया सुविधाही उपलब्ध असून, दर शनिवारी मोफत ओपीडी सेवा दिली जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये २०२१ पासून थॅलेसेमिया डेकेअर आहे. या डेकेअरमध्ये १५० हून अधिक मुले दरमहा नियमित रक्तसंक्रमण घेत आहेत. मोफत रक्त संक्रमण, मोफत तपासणी आणि औषधोपचार अहमदनगर जिल्ह्यातील एकमेव केंद्र जेथे मोफत ल्युकोफिल्टर देण्यात आल्याची माहिती डॉ. लिझा बलसारा यांनी दिली. या शिबिरात ८५ बालकांची मोफत तपासणी करण्यात आली. तर ९० थॅलेसेमिया ग्रस्त रुग्णांची उपचारासाठी नाव नोंदणी झाली आहे. सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी केले. आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.



डॉ.कांकरिया दाम्पत्याचा नक्षत्र परिवार प्राणायाम ग्रुपच्या वतीने सत्कार करताना माजी महापौर भगवान फुलसौंदर व इतर.

# डॉ.कांकरिया दाम्पत्याचे कार्य खूप मोठे आणि आदर्शवत

## भगवान फुलसौंदर यांचे प्रतिपादन; नक्षत्र परिवार प्राणायाम ग्रुपच्या वतीने सत्कार

नगर – डॉ. सुधा कांकरिया व डॉ.प्रकाश कांकरिया यांचे आरोग्य व सामाजिक क्षेत्रातील कार्य खूप मोठे आणि आदर्शवत आहे. त्यांनी नगर शहराचा नावलौकिक सर्वदूर नेण्यात मोलाचे योगदान दिले आहे. समस्त नगरकरांना त्यांचा नेहमीच अभिमान वाटतो, असे गौरवोद्‌गार माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी काढले.

नोबल पारितोषिकासाठी आंतरराष्ट्रीय मानांकन मिळाल्याबद्दल डॉ. सुधा कांकरिया यांचा नक्षत्र परिवार प्राणायाम ग्रुपच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी फुलसौंदर बोलत होते.डॉ. सुधाताई कांकरिया या स्त्री जन्माचे स्वागत करा या चळवळीच्या प्रणेत्या आहेत. महिला सक्षमीकरण, योगाभ्यास अशा त्यांच्या व्यापक समाजहिताच्या कार्याची अमेरिकेतही दखल घेण्यात आली आहे. रोटरी क्लबच्या आंतरराष्ट्रीय कार्यात त्यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव झाला आहे.

डॉ. कांकरिया दाम्पत्य अनेक वर्षांपासून आवडीने आणि सवडीने समाजाच्या विविध क्षेत्रात तनमनधनाने कार्य करीत आहेत. खऱ्या अर्थाने ते नगरचे भूषण आहेत. त्यांनी अनेक संस्थांना पाठबळ, प्रोत्साहन देऊन सामाजिक, कला, क्रीडा आरोग्य विषयक चळवळींना जिवंत ठेवले आहे, असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा कॉर्फबॉल असोसिएशनचे सचिव किशोर गांधी यांनी केले.

अविनाश ठोकळ यांनी डॉ. सुधा कांकरिया योगाभ्यास, ध्यानधारणा, मन:शांती यासाठी करीत असलेल्या कार्याचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमास रघुनाथ केदार, डॉ. हेमा सेलोत, रामकृष्ण आव्हाड, सुनील फुलसौंदर, अनंत गारदे, गोरख चौधरी, वाघमारे उपस्थित होते.

# नेत्रदानाने अंध व्यक्तींचे जीवन प्रकाशमान होते

## सुनिल सकट यांचे प्रतिपादन




नेत्रदान संकल्प फॉर्म भरून देताना सुनिल सकट व कुटुंबीय.

नगर – निसर्ग किती सुंदर आहे व निसर्गात रंग किती आहेत हे अंध मनुष्यास कधीच दिसत नाहित. त्यांचे जगणे अतीशय प्रतिकुल असते. अंधांचे जिवण प्रकाशमान तथा सुसह्य करण्यासाठी घरातील किमान एका व्यक्तीने मरणोत्तर नेत्रदान तथा अवयव दान करण्याचा संकल्प करुन आपले कर्तव्य पार पाडले पाहिजे असल्याची भावना सुनिल सकट यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र शासनाचा साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे पुरस्कार विजेते सुनिल सकट यांनी समाजसेवेचे भान राखुन आपल्या परीवारातील सदस्य वंदना सकट, आरती सकट, स्वतः सुनिल सकट यांनी मरणोत्तर नेत्रदान करण्याचा संकल्प फॉर्म शासकिय जिल्हा रुग्णालयात भरून नेत्र विभागात नेत्रदान समुपदेशक सतिष आहिरे यांच्याकडे जमा केले. तर सुनील सकट यांनी यावेळी मरणोत्तर देहदानाचा ही फॉर्म भरून दिला यावेळी ते बोलत होते

ते पुढे म्हणाले मी कोठेही कार्यक्रमासाठी गेलो तरी तिथे नेत्रदान अवयदानची जनजागृती करणार आहे, आपण शासकिय जिल्हा रुग्णालयात हा फॉर्म भरून द्यावा असे आवाहन त्यांनी केले

# राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेत सार्थक सकटला सुवर्णपदक



नगर – नागपूर येथे झालेल्या राज्यस्तरीय खुल्या युवा क्रिडा स्पर्धेत सार्थक किरण सकट याने थाळी फेक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्याने या अगोदर राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेत रौप्य पदक मिळवले आहे. तो पेमराज सारडा महाविद्यालयात शिक्षण घेत आहे.

त्याला ॲड. श्रीनिवास कराळे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# नेत्रदान पोस्टर स्पर्धेत अनुमीत पात्रे याचा द्वितीय क्रमांक






नगर – येथील मानकन्हैया नेत्रपिढी, साई सूर्य नेत्रसेवा व रोटरी क्लब आयोजित जागतिक दृष्टिदान दिनाच्या निमित्ताने आयोजित नेत्रदान पोस्टर चित्रकला स्पर्धेत नगरमधील अनुमीत अमित पात्रे यास शालेय गटात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. त्याला रोख रुपये २००० व सन्मानपत्र व दृष्टी पुस्तक भेट देऊन त्याचा सन्मान करण्यात आला

याप्रसंगी मानकन्हैया नेत्रपिढीचे संचालक डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, अनामप्रेम संस्थेचे संचालक अजित माने, रोटरीचे अध्यक्ष माधव देशमुख, सचिव दीपक गुजराती, पुढील अध्यक्ष नितीन थाडे, सुभाष गर्जे आदी उपस्थित होते

अनुमीत पात्रे याने वर्तमानपत्रांचे कागद चिटकवून नेत्रदाना वरती कोलाज चित्र तयार केले होते व ते या स्पर्धेत पाठवले होते त्यास हे पारितोषिक मिळाले आहे.



सौरिश अग्रवाल सिया सुराणा विधी नरुला इशराजसिंग कंधारी

# आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे आंतरराष्ट्रीय पब्लिक स्पिकींग स्पर्धेत यश

## क्लायमेट चेंज विषयावर मांडले प्रभावी विचार

नगर – गुरुकुल द्रोणने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ऑनलाईन पब्लिक स्पिकींग स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्लायमेट चेंज आणि पृथ्वीचे भवितव्य या विषयावर अतिशय प्रभावी विचार मांडून बक्षीसे मिळवली. जगभरातील इयत्ता २ ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. थेट भाषण, रेकॉर्ड केलेले भाषण आणि रील्स, यासह एक मिनिटाच्या मर्यादेत क्लायमेट चेंज या गंभीर समस्येवर विद्यार्थ्यांनी विचार व्यक्त केले. ग्रेड ६ ते ८ मध्ये आयकॉन पब्लिक स्कूलच्या सौरिश अग्रवाल याला सर्वोत्कृष्ट भाषण पारितोषिक, सिया सुराणा हिला उपविजेतेपद तर इशराज सिंग कंधारीने उत्तेजनार्थ पारितोषिक मिळवले. इयत्ता ९ ते १२ वी गटात विधी नरुला ही उपविजेती ठरली.

या उपक्रमाला जगभरातील तरुण वक्त्यांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणांनी आणि सर्जनशील सादरीकरणाने परीक्षक मंडळाला प्रभावित केले. प्रत्येक श्रेणी आणि ग्रेड गटातील विजेत्यांनी पब्लिक स्पिकींगचे कौशल्य आणि हवामान बदलाची सखोल समज दाखवून आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रशंसा मिळवली.

प्राचार्य दिपिका नगरवाला म्हणाल्या की, आंतरराष्ट्रीय मंचावर शाळेतील विद्यार्थ्यांनी अभिमानास्पद कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांचा सखोल अभ्यास, आणि वक्तृत्व कौतुकास्पद ठरले. या उपक्रमाने केवळ तरुणाईला एक महत्त्वपूर्ण व्यासपीठच उपलब्ध करून दिले नाही तर हवामान बदलांबद्दल जागरुकताही वाढवली.

# भिक्षेकऱ्यांच्या हस्ते पुरातन ‘श्रीशिवप्रधान दत्त मंदिरात’ महाआरती

## चौपाटी कारंजा मित्र मंडळाने दिलेल्या बहुमानाने भारवल्या महिला भिक्षेकरी



चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने येथील चौपाटी कारंजा चौकातील पुरातन ‘श्रीशिवप्रधान दत्त’ मंदिरात महिला भिक्षेकरींच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी मंडळाच्या वतीने महिला भिक्षेकरींचा त्यांना शाल श्रीफळ देवून सन्मान करण्यात आला. यावेळी चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

नगर – चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने येथील चौपाटी कारंजा चौकातील गोरेगावकर परिवाराच्या पुरातन ‘श्रीशिवप्रधान दत्त’ मंदिरात दर गुरुवारी सायंकाळी विविध क्षेत्रातील भाविकांच्या हस्ते सामुहिक महाआरती करण्याचा उपक्रम गेल्या अनेक महिन्यांपासून राबवला जात आहे. या उपक्रमा अंतर्गत १३ मे रोजी झालेली ८० वी महाआरती मंदिरा बाहेर बसणाऱ्या महिला भिक्षेकऱ्यांच्या हस्ते करून अनोखा दुर्मिळ उपक्रम राबवला. चौपाटी कारंजा मित्र मंडळाने दिलेल्या बहुमानाने भरवलेल्या महिला भिक्षेकरींच्या डोळ्यांच्या कडा आरती करताना ओल्या झाल्या.

चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने गेल्या अनेक महिन्यांपासून दर गुरुवारचा महाआरतीचा उपक्रम राबवण्यात येत आहे. यासाठी कोणतीही देणगी न घेता विविध क्षेत्रातील भाविकांच्या हस्ते श्रीशिवप्रधान दत्ताची सामुहिक महाआरती करण्यात येत आहे. मंडळाच्या वतीने १३ मेच्या गुरुवारच्या महाआरतीस कोणत्याही प्रतिष्ठितांना पाचारण न करता मंदिरा बाहेर बसणाऱ्या भिक्षेकरी महिलांना महाआरतीचा बहुमान देवून त्यांच्या हस्ते आरती करण्यात आली. तसेच त्यांना शाल श्रीफळ देवून सन्मानितही करण्यात आले. यावेळी भाविक उपस्थित होते. आरती नंतर भाविकांना प्रसाद देण्यात आला.

एरवी मंदिरात भिक्षेकरींना प्रवेशही दिला जात नाही किंवा त्यांना कोणी जवळही करत नाही. परंतु चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सामाजिक जाणीवेतून भिक्षेकरींना आरतीचा बहुमान देवून हा दुर्मिळ उपक्रम राबवला. चौपाटी कारंजा मित्र मंडळाने दिलेल्या या बहुमानाने भरवलेल्या भिक्षेकरींच्या डोळ्यात आरती करताना पाणी आले.

यावेळी चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे अध्यक्ष अमोल भंडारे, महेंद्र ताकपीरे, सूचित भळगट, प्रदीप बोज्ञा, महेश कुलकर्णी, मनीष भंडारे, सुरेंद्र सोनवणे, नरेंद्र सोनवणे, तुषार भागानगरे, सागर रोहोकले, राहुल वरखेडकर, मयूर कुलकर्णी, आर्यन दिवाणे, अर्णव नगरकर, तेजस वैद्य, पुरुषोत्तम बुरसे, गणेश भालेराव गुरुजी, ॲड.पराग देशमुख, सौ.दीपाली भळगट, श्रीमती अरुणा आंबेकर, सौ.रोहिणी पुंडलिक, सौ.सपना भळगट, तनुश्री भळगट आदींसह भाविक उपस्थित होते.

चौपाटी कारंजा चौकातील पुरातन ‘श्रीशिवप्रधान दत्त मंदिरात’ दर गुरवारी होणाऱ्या महाआरतीस उपस्थित असलेल्या भाविकांना चौपाटी कारंजा मित्र मंडळाच्या वतीने साबुदाणा खिचडी प्रसादाचे वाटप करण्यात येते. काल गुरवारी झालेल्या महाआरतीत सहभगी झालेल्या एका महिला भिक्षेकरीने खिचडीच्या प्रसादासाठी एक हजार रुपये मंडळास दिले. दत्त मंदिरासाठी काहीतरी करण्याची माझी खूप दिवसांपासूनची इच्छा होती ती आज पूर्ण झाली आहे, अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

# आय एम एस ॲकॅडमी ऑफ फाईन अँड परफॉर्मिंग आर्टस्‌च्या गांधर्व महाविद्यालयाच्या शंभर टक्के निकालाची परंपरा कायम

## नगरमधील नृत्य संस्कृती वाढविण्यासाठी ॲकॅडमीचा मोलाचा वाटा



आय एम एस ॲकॅडमी ऑफ फाईन अँड परफॉर्मिंग आर्टस्‌च्या गांधर्व महाविद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थिनी.

नगर – २३ वर्षांपूर्वी सुरु केलेल्या आयएमएस डान्स ॲकॅडमीच्या माध्यमातून नगरमध्ये मुलींसाठी शास्त्रीय नृत्य शिकविण्याची परंपरा सुरु केली. आज हजारो मुली या संस्थेतून भरतनाट्यम व कथ्थक नृत्य शिकून त्याचा वारसा चालवत आहेत. त्यामुळे नगर मधील नृत्य संस्कृती वाढविण्यासाठी या संस्थेचा मोलाचा वाटा आहे असे प्रतिपादन बीपीएचई संस्थेच्या ॲकॅडमी ऑफ फाईन अँड परफोर्मिंग आर्ट्सच्या प्राचार्या चैत्राली पांडे यांनी केले.

शरद कोलते सर यांच्या मार्गदर्शनाखाली केवळ ५ मुलींनी सुरुवात केलेली ही अकादमी, आता ३०० पेक्षा जास्त मुली आज या ठिकाणी शास्त्रीय नृत्याचे धडे गिरवत आहेत. पं.मनिषाताई साठे आणि डॉ. स्वातीताई दैठणकर यांच्या मार्गदर्शनामुळे मुलींना नृत्यातील बारकावे, त्यातून निर्माण झालेली सृजनात्मकता व नृत्या विषयी असणारी आस वृद्धिंगत होत आहे आणि याचा फायदा मुलींना फक्त नृत्यात होत नाही तर अभ्यास व शारीरिक व्यायामात पण होतो. कोरोना काळात देखील ऑनलाईन पद्धतीने वर्ग सुरूच होते त्यामुळे विद्यर्थिनींच्या नृत्यशिक्षणात कुठेही खंड पडला नाही आणि याचा त्यांना खूप फायदा झाला. इतकेच नाहीतर या ठिकाणी अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, या केंद्रीय संस्थेच्या माध्यमातून घेण्यात येत असलेल्या परीक्षेची देखील तयारी करण्यात येते.

संस्थेच्या या डिप्लोमा कोर्समध्ये भरतनाट्यम व कथ्थक यांच्या सुरुवाती पासून ते अद्ययावत् स्वरूपाच्या रूपापर्यंत अभ्यास घेतला जातो. दरवर्षी रंगमंचावर नृत्य करण्याची संधी, वेगवेगळ्या नृत्यस्पर्धांची तयारी, वर्कशॉप्स, नृत्या संबंधी वेगवेगळे उपक्रम येथे राबविले जातात. आणि ह्या सर्वांचे फलित म्हणून यंदा एप्रिल २०२४ सत्रातील अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ यांच्या तर्फे घेण्यात आलेल्या भरतनाट्यम नृत्य परीक्षेत संस्थेचा १००% निकाल लागला असून सर्व विद्यार्थिनी विशेष योग्यता व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या आहेत ही अतिशय अभिमानाची बाब आहे अशी माहिती ॲकॅडमीच्या प्राचार्या सौ. चैत्राली पांडे यांनी दिली.

संस्थेच्या माध्यमातून आपली परंपरा संस्कृती जोपासली जात आहे आणि ती नवीन पिढीच्या मनात रुजवण्याचा सतत प्रयत्न करीत असतो आणि सर्व पालक वर्गाने आपल्या पाल्याच्या कलागुणांना वाव द्यावा, असे आवाहन ही संस्थेचे संचालक डॉक्टर एम. बी. मेहता यांनी केले आहे आणि २०२४–२५ ह्या शैक्षणिक वर्षातील भरतनाट्यम, कथक, नृत्ययोगा, लेडीज बॅच या कोर्सेसची नवीन प्रवेश प्रक्रिया सुरू झालेली आहे, अशी माहिती दिली.

शाळेच्या वेळा सांभाळून शनिवार व रविवार याचे वर्ग घेतले जातात. त्यामुळे मुलींना हा अभ्यासक्रम करताना कोणतीही अडचण येत नाही. या सर्व कोर्सच्या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, १५ जून रोजी नवीन प्रवेश घेऊन इच्छिणाऱ्यांची संध्याकाळी ६ वाजता आय एम एस ॲकॅडमी ऑफ परफॉर्मिंग आर्ट्स इथे मीटिंग घेतली जाणार आहे तरी सर्व इच्छुक पालकांनी ६ वाजता ॲकॅडमीमध्ये मिटींगला उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेच्या समन्वयक प्राध्यापक डॉक्टर ऋचा तांदूळवाडकर यांनी केले आहे

या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ९८८१००७५४३ किंवा ९८५०३७०१४१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ॲकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

# ओजस गुजराथी वादन परिक्षेत नगर केंद्रात प्रथम




नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या मध्यमा पूर्ण या परीक्षेत श्री ज्ञान सरस्वती संगीत निकेतनचा विद्यार्थी ओजस अपूर्व गुजराथी याने सिंथेसायझर या विषयात प्रथम श्रेणी मिळवून नगर केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळविला. त्यास श्री ज्ञान सरस्वती संगीत निकेतनच्या संचालिका संपदा चौधरी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

चि.ओजस हा ऑक्झिलियम कॉन्व्हेंट स्कूल येथे दहावीमध्ये शिकत आहे. तो नगर येथील उद्योजक व टेक्नो सेल्स आणि इंडस्ट्रो सेल्सचे मालक अपूर्व गुजराथी यांचा मुलगा आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## सीएआर-टी थेरपीचे वरदान



रक्ताच्या कर्करोगावर उपचारासाठी भारताच्या अत्याधुनिक उपचार पद्धतीला मंजुरी मिळाली असल्याने लिम्फोमासारख्या गंभीर कर्करोगांवर यापुढे उपचार करणे शक्य होणार आहे. सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशनने (सीडीएससीओ) विशेष कार्य समितीच्या शिफारशीवर भारताच्या स्वदेशी काईमेरिक एंटिजन रिसेप्टर सीएआर-टी सेल थेरपीला बाजारात आणण्याची परवानगी दिली.

या उपचार पद्धतीत कर्करोग झालेल्या रूग्णांच्या पांढऱ्या पेशींसह टी सेल्स काढले जातात. त्यानंतर ते प्रयोगशाळेत आणून पांढऱ्या रक्ताच्या पेशी त्यातून वेगळ्या केल्या जातात. त्यानंतर टी सेल्सचे संशोधन करून त्यांना पुन्हा रूग्णाच्या शरीरात घातले जाते. ही प्रक्रिया फक्त एकदा केली जाते. रूग्णाच्या शरीरात गेल्यानंतर टी सेल्स कर्करोगाविरूद्ध लढतात आणि त्यांना आतूनच संपवण्यास सुरूवात करतात. ल्युकेमिया आणि लिम्फोमासाठी या उपचार पद्धतीला मंजुरी देण्यात आली आहे.

यापूर्वी २०१७ मध्ये अमेरिकेत या थेरपीला मंजुरी देण्यात आली होती. तेथे एका रूग्णाला जवळपास ३ ते ४ कोटी रूपये खर्च करावे लागतात; पण २०१८ पासून भारतीय संशोधकांनी यावर संशोधन सुरू केले. सध्या पुढील काही दिवसांत ३० ते ४० लाख रूपये खर्चात या उपचार पद्धतीचा अवलंब केला जाऊ शकेल, असे संकेत आहेत.

सध्या देशात प्रत्येक वर्षी जवळपास १४ लाख लोकांना कर्करोग झाल्याचे निष्पन्न होत आले आहे आणि प्रत्येक वेळी याचे प्रमाण वाढतच चालले आहे. सध्या कर्करोगावर उपचारासाठी रेडिओथेरपी, केमोथेरपी आणि शस्त्रक्रियेचे पर्याय उपलब्ध आहेत. मात्र, जगभरातील अनेक देशात कार सेल थेरपीवर देखील अधिक संशोधन व्यापक स्तरावर सुरू आहे. यालाच इम्युनोथेरपी असेही म्हणतात. शरीरात कर्करोगाविरूद्ध लढणाऱ्या प्रणालीला विकसित करत लरुणाला या गंभीर आजारापासून वाचवणे असा याचा उद्देश आहे.

## सर्वात धोकादायक बीच!



दक्षिण आफ्रिकन देश नामिबीयात विस्तीर्ण पसरलेल्या ४० किलोमीटर रूंद आणि ५०० किलोमीटर लांब तट क्षेत्राला जगभरातील सर्वात धोकादायक बीच असे ओळखले जाते. या बीचवर असंख्य हाडांचे सांगाडे, जहाजांचे अवशेष आणि विध्वंसक जंगली प्राण्यांमुळे या बीचवर ही परिस्थिती उद्भवल्याचे सांगितले जाते. बिबटे, चित्ता, वाघ येथील वाळवंटात जागोजागी दबा धरून बसतात आणि संधी मिळताच क्षणाचाही अवधीन दवडता सावज टिपतात. यामुळे हा बीच अधिक धोकादयक बनला असल्याचे स्थानिक जाणकारांचे मत आहे. या बीचच्या बहुतांशी भागात केवळ प्रशिक्षित टुरिस्ट ऑपरेटच्या माध्यमातूनच पोहोचले जाऊ शकते. याचे कारण असे की, एकट्याने या बीचवर उतरणे निव्वळ धोक्याचे आहे.

हा समुद्र किनारा नॅशनल पार्क देखील दक्षिण आणि उत्तरी क्षेत्रात विभागला गेला आहे. यातील दक्षिणेकडील भागात सहज पोहोचता येते. स्केलेटन कोस्ट पार्क दक्षिणेकडल नॅशनल वेस्ट कोस्ट रिक्रिएशन एरिया असून तेथे मोठ्या प्रमाणात मासे आढळून येतात आणि यामुळे मच्छीमारांचे हे आकर्षण केंद्र आहे. इकाई मॅगझिनमधील एका वृत्तानुसार, अधिकाऱ्यांनी वाघांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि त्यांना पर्यटकांपासून दूर ठेवण्यासाठी पाणीसाठ्याची सुविधा उभी केली गेली आहे. त्याला जियोफेन्स नावाने ओळखले जाते. या समुद्र किनाऱ्याला जहाजांची सर्वात मोठी स्मशानभूमी म्हणून देखील ओळखले जाते. याचे कारण म्हणजे थोडेथोडके नव्हे तर चक्क ५०० जहाजांचे अवशेष येथे विविध ठिकाणी विखुरले गेले आहेत. ही जहाजे तुटण्याचे मुख्य कारण नेहमी खवळलेला आणि उथळ समुद्र हे आहे. इन्फो नांबियाच्या वृत्तानुसार, शतकभरापूर्वी येथे कित्येक जहाजे बुडाली आहेत आणि त्यामुळे हे अवशेष मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत.

## खेड्यापेक्षाही छोटा देश!



जगभरात अशा अनेक गोष्टी असतात, ज्याची आपल्याला कल्पना देखील असत नाही. जगातील छोट्या देशांमध्ये सॅन मॅरिनो आणि व्हॅटिकन सिडीचा आवर्जून समावेश होते. मात्र, एक देश असाही आहे, जो केवळ १४ किलोमीटर अंतरापुरताच मर्यादित आहे आणि त्या देशाची लोकसंख्या जेमतेम २९७ इतकीच आहे! या छोट्याशा देशाचे नाव सेबार्गो असे असून त्याच्या क्षेत्रफळात एखादे छोटे गावदेखील वसू शकणार नाही!

आता १ हजार वर्षांपूर्वी सेबार्गोला स्वातंत्र राष्ट्राचा दर्जा लाभला. आता हा देश छोटा आहे म्हणून तेथे जाण्यासाठी पासपोर्ट लागत नाही, असेही नाही. या देशातही जाण्यासाठी त्यांचे नियम, त्यांची संहिता पाळावी लागते. पासपोर्ट, व्हिसासारख्या औपचारिकता साहजिकच पूर्ण करावाया लागतात.

या छोट्या देशाला १ हजार वर्षापूर्वी स्वातंत्र्य लाभले आणि पोपनी त्याच्या मालकाला राजा म्हणून घोषित केले. १७१९ मध्ये चक्क या देशाचीच विक्री झाली; पण मायक्रोनेशनचा दर्जा कायम राहिला. १८०० मध्ये इटलीचे एकीकरण झाले, त्यावेळी सर्वांना या देशाचा विसर पडला. १९६० मध्ये देशाचा राज्याचा दर्जा कायम आहे, याची जाणीव होताच येथील एका नागरिकाने स्वत:लाच देशाचा राजा घोषित केले आणि पुढील ४० वर्षात देशाचा स्वतंत्र कायदा, चलन, स्टॅम्प आणि राष्ट्रीय सुट्टीही तयार केली. त्यावेळी ३२० लोकांच्या देशाचा मार्सेलो हा राजा झाला. सध्या सेबार्गोची मालकी राजकुमारी नीना हिच्याकडे आहे. २०१९ मध्ये तिला निवडण्यात आले होते. सर्जिओ लुगिनो हे या देशाचे चलन आहे. आताही विदेशी पर्यटक येथे फक्त हा देश आहे कसा, ते पाहण्यासाठी येत राहतात आणि लोकांना येथे आल्यावर टाईम ट्रॅव्हेलची अनुभूती येते, असे सांगितले जाते. सध्या या देशाची लोकसंख्या जेमतेम २९७ इतकी आहे.

## पास्ता बनवला आणि कोट्यधीश बनला



आपण एखादी कला आत्मसात करतो, त्यावेळी त्याचे अनेक फायदे आपल्याला कळत-तकळत होत असतात. मग ती कला भाजी विक्रीची असेल, शेतीची असेल किंवा स्वयंपाकाची. आता त्या व्यक्तीचे वय किती आहे, त्याचा यात काहीच फरक पडत नाही. फरक इतकाच पडतो की, मसोरील व्यक्ती प्रेझेंटेशन कसे देते आहे. जर ती बाब क्लिक झाली तर क्षणार्धात कसे देते आहे. जर ती बाब क्लिक झाली तर क्षणार्धात ती व्यक्ती गर्भश्रीमंत होऊ शकते. अमेरिकेतील एका २३ वर्षीय युवाकाबाबत असेच घडले असून पास्ता तयार करण्याचा व्हिडीओ करता करता तो कोट्यधीश होण्याच्या मार्गावर पोहोचला!

गियानलुंके कोटे असे या २३ वर्षीय युवकाचे नाव आहे. सोशल मीडियावर त्याची बरीच क्रेझ आहे. ही क्रेझ सध्या अशा शिखरावर पोहाचली आहे की, त्याला अगदी एका पोस्टसाठी देखील एक लाख रूपये मिळतात. या युवकाने २०१९ मध्ये पास्ता तयार करतानाचा पहिला व्हिडीओ पोस्ट केला होता.

नॉर्थ कॅरोलिनामधील रहिवासी असलेल्या गियानलंकेचे टिकटॉकवर सध्या दीड कोटीपेक्षा अधिक फॉलोअर्स आहेत. पहिला व्हिडीओपोस्ट केला. त्यावेळी तो महाविद्यालयीन शिक्षण घेत होता आणि याचबरोबरीने आपल्या वडिलांच्या रेस्टॉरंटमध्ये काम करत होता. यादरम्यान त्याने एक छोटासा व्हिडीओ पोस्ट केला आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळताच त्याचा आत्मविश्वासही वृद्धिंगत झाला. पुढे फॉलोअर्स इतके वाढत गेले की, चेस, कोका कोला आणि डोअरडॅशसारख्या कंपन्यांनी त्याच्याशी जाहिरातींचे करार केले आणि यामुळे तो कोट्यधीश बनत गेला.

## महामहागडा साबण!

जगातील सर्वात महाग साबणाची किंमत किती असेल, असा प्रश्न विचारला तर दोन-एक हजारांपर्यंत असे उत्तर आले तर एकवेळ ते स्वाभाविकही मानले जाऊ शकते. कारण, हजार-दोन हजार नव्हे तर अगदी १००-२०० रूपयांचा साबण घेत असतानाही हजार वेळा विचार केला जाणे साहजिकच असते. पण, जगात एक साबण असाही आहे, ज्याची किंमत पाहूनच डोळे दिपून




जातील. कारण, एक साबण इतका महागडा आहे की, त्या किमतीत सोन्याच्या हार देखील सहजपणे विकत घेता येऊ शकेल.

आता एखादा साबण इतका महागडा असण्याचे कारण काय, असा प्रश्न पडू शकेल. पण, याचे उत्तर असे आहे की, या साबणात चक्क सोने आणि हिरे देखील घातले जातात. त्यामुळेच हा साबणाचा दर अव्वाच्या सव्वा असतो. लेबनॉनमधील त्रिफोली येथे हा साबण तयार केला जातो. याची किंमत २८०० डॉलर्स अर्थात २ लाख ७ हजार ८०० रूपये इतके आहे. बशर हसन अँड सन्स ही कंपनी या साबणाची निर्मिती करते. या साबणाला त्यांनी 'द खान अल साबून' असे नाव दिले आहे. याशिवाय, या कंपनीत अनेक लक्झरी साबण आणि क्रीम देखील तयार देखील तयार होतात. त्रिफोलीतील या जागेवर साबण तयार करण्याची परंपरा १५ व्या शतकापासून चालत आली आहे.

हसन अँड सन्स यांनी दिलेल्या माहितीनुसार, साबणाच्या पहिल्या टप्प्यात सोन्याची आणि हिऱ्याची पावडर वापरली जाते. प्रारंभी हा साबण पनीरच्या एका तुकड्यासारखा दिसून येतो. पण, नंतर त्याचे स्वरूप बऱ्याच प्रमाणात बदलले गेले. हा साबण घेणारे बहुतांशी ग्राहक दुबई शहरातील आहेत. हाताने तयार केले जाणारे हे साबण अगदी मोजक्या दुकानात उपलब्ध असतात. बरेचसे खरेदीदार दुबईत आहेत तर काही अगदी महत्त्वाच्या लोकांपर्यंतच हे साबण पोहोचवले जातात. हा सोन्याचा साबण सर्वप्रथम २०१३ मध्ये तयार केला गेला आणि कतारच्या प्रथम महिलेला भेट स्वरूपात देण्यात आला होता. या साबणात १७ ग्रॅम खरे सोने असते. याशिवाय, हिऱ्याची पावडर, शुद्ध तेल, सेंद्रिय मध, खजूरासह काही घटक यात वापरले जातात.

## चंद्रावर रस्ते बनणार?



अनेक देशांच्या रस्त्यांची इतकी चाळण झालेली असते की त्यावरील खड्डे पाहून अनेकांना चंद्रावरील खड्डे आठवत असतात. आपल्या देशातही असे खड्डे पाहून आम्ही जणू चंदावरच आहोत असे वाहनचालक म्हणत असतात. मात्र, खुद्द चंद्रावरच आता गुळगुळीत रस्ते बनवण्याची तयारी सुरू आहे. युरोपियन स्पेस एजन्सीने त्यासाठीचे तंत्र विकसित करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

चंद्रावर मानवी वसाहत बनवण्यासाठी सध्या अमेरिकेची 'नासा'ची अंतराळ संस्था प्रयत्नशील असताना आता युरोपियन स्पेस एजन्सीने चंद्राच्या पृष्ठभागावर रस्ते बनवण्याचे तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दृष्टीने काम सुरू केले आहे. पृथ्वीवरून पाठवण्यात आलेले लँडर किंवा रोव्हर यांचे चांद्रभूमीवर सॉफ्ट लँडिंग व्हावे आणि संशोधनात अडचण येऊ नये, यासाठी चंद्राचा पृष्ठभाग समतल बनवण्यासाठी हा प्रयत्न सुरू असल्याचे संस्थेने म्हटले आहे. या योजनेला 'पेव्हर'असे नाव देण्यात आले आहे. शक्तीशाली लेसरचा वापर करून चंद्राच्या धुळीने भरलेल्या पृष्ठभागाला मजबूत आणि समतल बनवले जाईल. चंद्राच्या मोठ्या भागात खड्डे आणि धूळ असून कोणत्याही मोहिमेसाठी ही बाब आव्हानात्मकच बनत असते. 'अपोलो'मोहिमांमध्येही तेथील धुळीने समस्या निर्माण केली होती. 'अपोलो १७' च्या रोव्हरचे या धुळीने मोठे नुकसान केले होते. आता युरोपियन स्पेस एजन्सीने ठरवले आहे की चंद्रावर मोठी मोहिम आखण्यापूर्वी तेथील पृष्ठभाग लँडिंगच्या दृष्टीने समतल बनवावा. त्यासाठी लेसर बीमचा वापर केला जाईल आणि नंतर ठोस पृष्ठभागाला 'इंटरलॉक' केले जाईल. त्यामुळे चंद्रावर रस्ते आणि लँडिंग पॅड तयार होतील. जर ते तुटले तर त्यांची नव्याने डागडुजीही करता येईल. टीमचे अनुमान आहे की १०० चौरस मीटरच्या लँडिंग पॅडची जाडी दोन सेंटीमीटर असेल आणि हा पॅड ११५ दिवसांमध्ये तयार होईल. या प्रोजेक्टसाठी गुंतवणुकीची दालनेही खुली करण्यात आली आहेत. चंद्रावर असे प्लॅटफॉर्म बनवल्यानंतर संशोधनाचे काम सोपे होईल असे या स्पेस एजन्सीला वाटते.

## भरधाव कारचालकाला कोट्यवधींचा दंड!

कार अति वेगाने चालवली, यावरून ५ हजार ते १० हजारांचा दंड झाल्याचे अनेक किस्से आपण पाहिले असतील; पण अमेरिकेतील एका व्यक्तीला अतिवेगाने कार चालवल्याबद्दल थोडाथोडका नव्हे तर चक्क साडेसहा कोटी रूपयांचा दंड ठोठावला गेला आहे. याविरोधत त्या व्यक्तीने पुढे न्यायालयाचे दरवाजे ठोठावले; पण न्यायालयाने देखील पोलिसांची बाजू योग्य असल्यचा निर्वाळा दिला.



जॉर्जिया येथील कॉनर कैटो हा २ सप्टेंबर रोजी सवानामार्गे आपल्या घरी परतत होता. यादरम्यान प्रवासात त्याला पोलिसांनी प्रतितास १४५ कि.मी. वेगाने कार चालवत असताना रंगेहाथ पकडले. तेथे ९० किलोमीटर्स प्रतितास इतक्याच वेगाला मान्यता होती. कॉनरला आत आपल्याला दंडात्मक कारवाईला सामोर जावे लागेल, हे लक्षात आले. पण घरी पोहोचल्यानंतर त्याला दंडाची रक्कम कळाली, त्यावेळी त्याच्या पायखालची वाळूच सरकली! कारण, पोलिसांनी त्याला थोडीथोडकी नव्हे तर चक्क ६.५ कोटी रूपये इतकी रक्कम दंड म्हणून भरण्यास सांगितली.

प्रारंभी, ही टायपिंगची चूक असेल, असे वाटल्याने त्याने कॉल सेंटरशी संपर्क साधला; पण दंडाचा आकडा बरोबर असल्याचे सांगण्यात आल्यानंतर त्याला आणखी एक धक्का बसला. एक तरी २१ डिसेंबरपर्यंत दंड भरावा लागेल. किंवा न्यायालयात समक्ष हजर राहावे लागेल, असे त्याला यावेळी सांगण्यात आले.

इतका मोठा दंड का आकारण्यात आला, याची कारणमीमांसाही येथे करण्यात आली. अमेरिकेतील ऑटोमेटिक सॉफ्टवेअर सुपर स्पीडर्सने हा वेग पकडला आणि त्याच माध्यमातून दंडाची रक्कमही निश्चित केली गेली. अमेरिकेत कमाल वेगमर्यादपेक्षा किती अधिक फरकाने ड्रायव्हिंग केले, यावरून दंड रक्कम ठरते. त्याचा कॉनर कैटोला येथे फटका बसल्याचे सांगण्यात आले. यापूर्वी फिनलंडमधील एका व्यावसायिकाला देखील वेगमर्यादा न पाळल्याने ६ कोटींचा दंड ठोठावण्यात आला होता. एंडर्स विक्लाफ असे त्या ७६ वर्षीय व्यावसायिकाचे नाव आहे. वाहतूक विभागाने त्यावेळी दहा दिवसांकरिता त्यांचा परवानाही रद्द केला होता.

## गारवा देणारे तेल वापरताय?

**डोकेदुखी, थकवा आणि निद्रानाश दूर करण्यासाठी आपण थंड तेलाचा वापर करत असाल तर त्यातील कापराचे प्रमाण धोकादायक असेल का, याची खात्री करून घेणे तितकेच आवश्यक असणार आहे. हे तेल डोक्यातील नस आणि कमकुवत करू शकते.**

अशा तेलातील कापराचे प्रमाण अधिक असेल तर डोकेदुखी, ब्रेन हॅमरेज, ब्रेन स्ट्रोक, डोळ्याची कार्यक्षमता कमी होण्याची भिती अशा समस्या निर्माण होऊ शकतात, अशी भीती



अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. बीएचयूमधील न्यूरॉलॉजी विभागात प्रत्येक महिन्याला असे ५० पेक्षा रूग्ण येत आहेत आणि त्यात महिलांचे प्रमाण अधिक आहे. सध्या थंड तेलाचे ब्रँडिंग सेलिब्रिटीकडूनही करवले जाते. मात्र, त्याचे दुष्परिणाम अतिशय धोकादायक असतात. प्रा. व्ही. एन. मिश्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, तेलात कापराची मात्रा ११ एमईक्यू मि. लि. इक्विलेंट-लिटर इतकी असणे आवश्यक आहे; पण सध्या कापराचा वापर त्यापेक्षा अधिक केला जात आहे. काही कंपन्या तर चक्क २० ते २५ एमईक्यू कापराचा यात वापर करतात, असे निदर्शनास आले आहे.

## विश्वविक्रमी पत्त्यांचा बंगला


खेळातील पत्त्यांनी एखादा विश्वविक्रम करता येऊ शकतो का, असा प्रश्न विचारल्यास त्याचे उत्तर कदाचित नकारार्थी येऊ शकेल. पण कोलकात्यातील १ वर्षांच्या अर्णव डागा या मुलाने असाच भीमपराक्रम करून दाखवला आहे. अर्णवने छोट्या छोट्या पत्त्यांच्या सहाय्याने जगातील सर्वात मोठे प्लेईंग स्ट्रक्चर तयार केले आणि त्याची आता गिनिज बुकात नोंद झाली आहे. आश्चर्याची बाब म्हणजे त्याने यासाठी डिंकाचा किंवा अन्य कोणत्याही घटकाचा वापर केलेला नाही. अर्णवने कमालीची दक्षता पाळत हे प्लेईंग स्ट्रक्चर तयार केले. या स्ट्रक्चरमध्ये ऐतिहासिक इमारती, सॉल्ट लेक स्टेडियम, सेंट पॉल कॅथेड्रलचा समावेश आहे. अर्णवला चार प्रतिष्ठेच्या इमारतींचे स्ट्रक्चर उभे करण्यासाठी थोडेथोडके नव्हे तर चक्क ४ दिवस खर्ची घालावे लागले. या पूर्ण स्ट्रक्चरसाठी त्याने एकूण १ लाख ४३ हजार पत्यांचा वापर केला. या स्ट्रक्चरची लांबी ४० फूट आणि रूंदी ११ फूट ७ इंच इतकी आहे. अर्णवने यावेळी ब्रायन बर्गचा मागील विक्रम मोडीत काढला आहे. या स्ट्रक्चरबद्दल बोलताना अर्णव म्हणाला, 'वास्तविक, हे स्ट्रक्चर साकारने खूपच आव्हानात्मक होते. त्यासाठी मी वास्तुकलेचा अभ्यास केला.



त्यातील सूक्ष्म बाबी समजून घेतल्या ज्या ठिकाणच्या इमारती साकारणार होतो, तेथे प्रत्यक्ष भेट देऊन त्याची पाहणी केली. त्यानंतर हे स्ट्रक्चर उभे करणे शक्य झाले.

## गूढ एका समुद्रीजीवाचे

ऑस्ट्रेलियन शहर डार्विननजीक डंडी बीचवर एक रहस्यमय समुद्री जीव आढळून आला आहे. हा समुद्री



जीव चकमत्या निळ्या आणि पांढऱ्या रंगाचा, तसेच आकाराने गोल आहे. त्याच्या सर्व बाजूंनी केस धाग्यासारखे पसरले आहेत आणि यामुळे त्याची तुलना डिस्को बॉलशी केला जात आहे. लोकांनी समुद्र तटावर हा जीव पाहिल्यानंतर त्यावर आश्चर्य व्यक्त करणे साहजिकच होते.

एलियनसारख्या दिसणाऱ्या या जीवाला ज्या व्यक्तीने सर्वप्रथम पाहिले तो तेथे फेरफटका मारण्यासाठी आला होता. त्याची नजर त्या प्राण्यावर पडली आणि त्याने आसपासच्या लोकांनाही तो जीव दाखवला. सोशल मीडियावर याचे छायाचित्र पोस्ट केले गेल्यानंतर यावर अनेक प्रतिक्रिया येणे साहजिकच होते. काहींनी या जीवावर विश्वास ठेवणे कठीण असल्याचे सांगत ही आर्टिफिशियल इंटेलिजन्सची कमाल असू शकते, असे म्हटले तर काहींनी याला स्पर्श करण्याचा धोका आपण स्वीकारणार नाही, असे स्पष्ट केले. आणखी एक यूझर म्हणाला, 'जर मी ऑस्ट्रेलियात असतो आणि मला असे कही दिसले असते तर मी तत्काळ त्या समुद्रकिनाऱ्यापासून दूर गेलो असतो.'

